- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,५८,७०० /-
✔ २३ कॅरेट : १,५६,३५० /-
✔ चांदी : २,७८,३००/-

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : रविवार, १९ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २२० | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# राम मंदीर काय तुमच्या बापाची जहागिरदारी नाही !

राम मंदिर चोरी प्रकरणावरुन नागपुरात उद्धव ठाकरेंचा भाजपवर हल्लाबोल




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
अयोध्येतील राम मंदिरातील कथित चोरी प्रकरणाच्या निषेधार्थ शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज नागपुरात रामरक्षा पठण आंदोलन केले. यापूर्वी त्यांनी दादर आणि ठाणे येथेही अशाच प्रकारचे आंदोलन केले होते. नागपुरातील या आंदोलनाला ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी मोठी उपस्थिती लावली. यावेळी ठाकरेंनी भाजपवर जोरदार टीका केली. उत्तर प्रदेश विधानसभा अध्यक्ष म्हणतात की ज्यांनी श्रद्धेने पैसे दिले नाहीत ते चोरीला गेले. यावर बोलताना ठाकरे म्हणाले की, राम मंदीर तुमच्या बापाची जहागिरदारी नाही.

आता भाजपा मुक्त राम या आंदोलनाची सुरुवात आहे. राम भक्तांच्या श्रद्धेवर हा दरोडा असल्याचे ठाकरे म्हणाले. अटल बिहारी वाजपेयी म्हटले होते अभी हिंदू मार नही खायेगा, आता हिंदू उनको माफ नही करेगी अशी भुमिका घेतली पाहिजे असे ठाकरे म्हणाले.

**तरुणांना न्याय देणं हेच आमचं हिंदू राष्ट्र**

तरुणांना न्याय देणं हेच आमचं हिंदू राष्ट्र आहे. भागवत साहेब तुम्ही म्हणाले की दोन तीन अपत्य जन्माला घाला. पेपर फुटले ती मुलं आपली नाही का? असा सवाल ठाकरेंनी उपस्थित केला. बाबरी मशिद पाडली त्यावेळी बाळासाहेब एकटे उभे होते. भाजपवाले म्हणत होते की हे शिवसेनेचं काम असेल. बाळासाहेब यांनी ते अंगावर घेतले. अनेकांनी बलिदान केले ते या चोरांच्या पोटापाण्यासाठी नाही, राम मंदीर लुटारुंच्या विरोधात आम्ही आहोत. वर्गाच्या मॉनीटरसारखं बोलू नका रामरक्षा बोलून दाखवा केदारनाथ मंदीरात चोरी झाली आहे असे ठाकरे म्हणाले.

**भाजपने दगाबाजी केली म्हणून महाविकास आघाडी स्थापन केली**

गद्दारांनांही मला विचारायचं आहे की, तुमच्यात हिंमत आहे तर प्रश्न विचारावा. यांच्यात दम राहिला नाही. हे लाचार आहेत. भाजपने दगाबाजी केली म्हणून महाविकास आघाडी स्थापन केल्याचे ठाकरे म्हणाले. त्यावेळी हिंदुत्व सोडलं अशी टीका केली. मग तुम्ही का आता सोडलं? असा सवाल ठाकरेंनी केला. काशी विश्वनाथ आणि आयोध्येत जाऊन ही आरती करणार असल्याचे ठाकरे म्हणाले.

राम मंदिर चोरीबाबतीत चौकशीची नाटक करु नका

राम मंदिर चोरीबाबतीत चौकशीची नाटक करु नका. निवृत्त न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी करा. काही ही बोललं तर देशद्रोही ठरवतात असे ठाकरे म्हणाले. उत्तर प्रदेश विधानसभा अध्यक्ष म्हणतात की ज्यांनी श्रद्धेने पैसे दिले नाही ते चोरीला गेले आमचे तसेच आहे. राम मंदीर तुमच्या बापाची जहागिरदारी नाही असेही ठाकरे म्हणाले.

**राम भक्तांच्या बाजूला आहात की मंदीर चोरांच्या बाजूला आहात हे मोहन भागवत यांनी स्पष्ट करावं**

मला रामरक्षा येत नसेल पण मला रामाची रक्षा करता येते. चोराहो मध्ये येऊ नका. राम भक्तांच्या बाजूला आहात की मंदीर चोरांच्या बाजूला आहात हे मोहन भागवत यांनी स्पष्ट करावं असे ठाकरे म्हणाले. मी अनेक राज्यांत जाणार आहे. गावोगावी हा लढा नेला पाहिजे. शेतकरी कर्ज मुक्ती झाली नाही. लाडकी बहिण योजनेतील ९२ लाख महिला बंद केल्या. महिलांना मिळणाऱ्या साड्या बंद केल्या अशी टीका ठाकरेंनी राज्य सरकारवर केली.

**सोनम वांगचुक आणि अभिजीत दिपके यांना समर्थन देण्यासाठी उद्या आंदोलन करणार**

सोनम वांगचुक आणि अभिजीत दिपके यांना समर्थन देण्यासाठी उद्या आंदोलन करणार असल्याचे ठाकरे म्हणाले. मी पहिल आंदोलन करेल आणि त्यांना नंतर दिल्लीत जाऊन भेटेल असेही ठाकरे म्हणाले. सर्व पक्षांना मी उद्याच्या आंदोलनात आमंत्रित करतो. देशासाठी या आंदोलनात सहभागी व्हा असेही ठाकरे म्हणाले.

थोडक्यात

## सोनम वांगचुक यांना हटवल्यानंतर अभिजीत दिपके आक्रमक

**नवी दिल्ली :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला शनिवारी सकाळी नवे वळण मिळाले. नीट परीक्षेतील कथित अनियमिततेविरोधात उपोषण करणारे पर्यावरण अभ्यासक सोनम वांगचुक यांना आंदोलनस्थळावरून हटवून रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर आंदोलनकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली. या घडामोडीनंतर कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी स्वतः आमरण उपोषण सुरू करण्याची घोषणा केली आहे. अभिजीत दिपके यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, आजपासून ते उपोषणाला बसत असून २० जुलै रोजी नियोजित मोर्चाही पूर्वनियोजितप्रमाणे काढण्यात येणार आहे. सोनम वांगचुक यांना आंदोलनस्थळावरून हटवून हे आंदोलन संपेल, असा सरकारचा समज असेल तर तो चुकीचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आंदोलन अधिक तीव्र स्वरूपात सुरूच राहील, असा इशाराही त्यांनी दिला. दिपके यांनी यावेळी केंद्र सरकारवरही जोरदार टीका केली. त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी पुन्हा एकदा केली. त्याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी अभिजीत दिपके यांनी गंभीर आरोपही केले. आंदोलनादरम्यान सोनम वांगचुक यांच्याशी गैरवर्तन करण्यात आल्याचा तसेच स्वतःला मारहाण झाल्याचा आरोप त्यांनी केला.



## नीट पेपरफुटीनंतर आता गुणांचा घोटाळा?

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
नीट परीक्षेचा घोळ काही संपता संपत नाहीये. पेपरफुटीनंतर आता नीट परीक्षेचा निकाल वादात सापडला आहे. उत्तरपत्रिकेनुसार अपेक्षित मार्क आणि स्कोअर कार्डवरील मार्कमध्ये मोठी तफावत असल्याचा आरोप परीक्षार्थींनी केला आहे. त्यामुळे आता नीटच्या निकालात घोटाळा आहे की काय अशी चर्चा सुरू झाली आहे. या निकालामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रम असून त्यांनी कोर्टात दाद मागण्याची तयारी सुरू केली आहे.

नीट यूजी २०२६ चा निकाल पुन्हा एकदा वादाच्या भोव-यात सापडला आहे. बीडमधील काही विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेनुसार अपेक्षित गुण आणि स्कोअर कार्डवरील गुणांमध्ये मोठी तफावत असल्याचा आरोप केला आहे. बीडच्या सोहम गवते या विद्यार्थ्यार्ला उत्तरपत्रिकेनुसार ५२२ गुण अपेक्षित असताना स्कोअर कार्डवर अवघे ९५ गुण आले आहेत. त्यामुळे सोहमने या निकालावर आक्षेप घेतला आहे.

गवते कुटुंब या अनपेक्षित निकालामुळे धक्क्यामध्ये आहे. एवढी मेहनत घेऊन नीट परीक्षेमधील गोंधळ आमच्या विद्यार्थ्यांचे भविष्य खराब करेल या भीतीने सोहमच्या वडिलांना अश्रू अनावर झाले आहेत. तर सोहमलादेखील मोठा धक्का बसला आहे. यावेळी त्याला कसं सावरलं हे आम्हाला माहिती, असं सोहमच्या आईने सांगितले आहे.

उत्तरपत्रिकेनुसार अपेक्षित मार्क आणि स्कोअर कार्डवरील मार्क या तफावतीमुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये तीव्र नाराजी असून, निकालात दुरुस्ती न झाल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणावर नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून काय स्पष्टीकरण येते, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

## इराणवर महाहल्ल्याची तयारी!



**वृत्तसंस्था, न्यूयॉर्क**
इराण आणि अमेरिका यांच्यातील लष्करी संघर्ष आता अत्यंत धोकादायक वळणावर पोहोचला आहे. इराणवर थेट आणि मोठा हल्ला चढवण्याच्या तयारीत अमेरिका असल्याचे दिसत आहे. या महायुद्धसदृश रणनीतीचा भाग म्हणून अमेरिकेने इस्त्रायलमध्ये डझनाहून अधिक अतिरिक्त एअर-टू-एअर रिफ्युलिंग विमाने पाठवण्यास सुरुवात केली आहे. या विमानांमुळे अमेरिकेची लांब पल्ल्याची लढाऊ विमाने आणि महाकाय बॉम्बर विमाने न थांबता सलग मोहीम राबवू शकणार आहेत. वॉशिंग्टनने इस्त्रायलला या मोठ्या तैनातीची अधिकृत माहिती दिली आहे. मात्र, अमेरिकेच्या या वॉर प्लॅनमुळे आता खुद्द इस्त्रायलच्या अंतर्गत राजकारणात मोठा वाद पेटला आहे.

सध्या इस्त्रायलमध्ये अमेरिकेची तब्बल ६० रिफ्युलिंग विमाने तैनात आहेत. यातील ३० विमाने तेल अवीवजवळील बेन गुरियन आंतरराष्ट्रीय विमानतळावर आणि ३० विमाने दक्षिण इस्त्रायलमधील रेमन विमानतळावर आहेत. आता पेंटागॉन आणखी डझनाहून अधिक विमाने इस्त्रायलमध्ये पाठवत आहे. युद्ध सुरू झाले त्या वेळच्या पातळीवर विमानांचा ताफा नेण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे. इराणच्या क्षेपणास्त्र किंवा ड्रोन हल्ल्याचा धोका लक्षात घेता, अमेरिकेला ही विमाने इतर देशांऐवजी इस्त्रायलच्या बेन गुरियन विमानतळावर सुरक्षित ठेवायची आहेत.

**राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या टेबलवर ३ मोठे प्लॅन्स**

व्हाईट हाऊसच्या सिच्युएशन रूममध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना इराणविरुद्धच्या नव्या लष्करी पर्यायांची माहिती देण्यात आली आहे. अमेरिका आता केवळ होर्मुझची सामुद्रधुनीच नाही, तर थेट इराणच्या आत घुसून मोठे हल्ले करण्याच्या विचारात आहे.

**अमेरिकेच्या रडारवर इराणचे हे प्रमुख ३ तळ आहेत :**

१. इराणचे पॉवर प्लांट्स बॉम्बस्फोट करून उडवून देणे.
२. इराणचा युरेनियमचा साठा नष्ट करण्यासाठी त्याच्या अणू तळांवर थेट स्ट्राईक करणे.
३. पिकएक्स माऊंटन या डोंगराळ भागात इराण गुप्तपणे एक भूमिगत अणू प्रकल्प तयार करत असल्याचा संशय आहे, हा अमेरिकेचा मुख्य निशाणा असू शकतो.

होर्मुझची सामुद्रधुनी आणि इराणच्या दक्षिण किनारपट्टीवर अमेरिकेचे हल्ले सलग सातव्या दिवशीही सुरूच राहिले. अमेरिकेने बंदर अब्बासजवळील किमान ७ पूल उद्ध्वस्त केले आहेत. हा परिसर इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सचा मुख्य लॉजिस्टिक हब मानला जातो.

## एसटीची भाडेवाढ म्हणजे सरकारचा सर्वसामान्यांच्या खिशावर डल्ला : वडेट्टीवार

**वृत्तसंस्था, मुंबई**
एसटीच्या भाडेवाढीवरून काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील सत्ताधारी महायुती सरकारवर जोरदार टीका केली आहे. एसटीची १३.५६ टक्के भाडेवाढ म्हणजे महायुती सरकारने सर्वसामान्यांच्या खिशावर मारलेला आणखी एक डल्ला आहे, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली आहे.

आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात झालेली वाढ आणि इतर कारणांमुळे वाढत असलेल्या आर्थिक भारामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एसटीच्या प्रवासी भाड्यामध्ये तब्बल १३.५६ टक्के एवढी वाढ केली आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाने भाडेवाढीच्या प्रस्तावास मान्यता दिल्याने ही भाडेवाड लागू झाली आहे. आता या भाडेवाढीवरून काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील सत्ताधारी महायुती सरकारवर जोरदार टीका केली आहे. एसटीची १३.५६ टक्के भाडेवाढ म्हणजे महायुती सरकारने सर्वसामान्यांच्या खिशावर मारलेला आणखी एक डल्ला



आहे, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली आहे.

एसटी महामंडळाने केलेल्या भाडेवाढीवर टीका करताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, महागाईने आधीच होरपळलेल्या जनतेवर महायुती सरकारने पुन्हा एकदा भाडेवाढ लादली आहे. विशेष म्हणजे जानेवारी २०२५ मध्येही एसटीच्या भाड्यात सुमारे १४.९५ टक्के वाढ करण्यात आली होती. म्हणजे अवघ्या दीड वर्षात सलग दोन वेळा भाडेवाढ करून सरकारने सामान्य प्रवासी, शेतकरी, विद्यार्थी आणि कामगारांच्या खिशावर घाला घातला आहे. डिझेलचे दर, देखभाल खर्च आणि कर्मचाऱ्यांच्या भत्त्यांचे कारण पुढे केले जात आहे. पण सरकारने स्वतःचा उधळपट्टीचा खर्च कमी करण्याऐवजी त्याचा भार जनतेवर टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

## महाराष्ट्रातील खासगी रुग्णालयांमध्येही आता 'इच्छामृत्यू'चे नियम लागू

**वृत्तसंस्था, मुंबई**
महाराष्ट्र सरकारने रुग्णांच्या हक्कांशी संबंधित एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्यातील सरकारी आणि खासगी रुग्णालयांसाठी समान नियम लागू करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. निष्क्रिय इच्छामृत्यू आणि लिव्हिंग विल या संदभार्तील सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी आता खासगी रुग्णालयांनाही करावी लागणार आहे. यासाठी राज्य सरकारने आवश्यक समिती स्थापन करण्याचे आदेशही जारी केले आहेत.

लिव्हिंग विल म्हणजे एखाद्या व्यक्तीने पूर्ण शुद्धीमध्ये आणि स्वेच्छेने तयार केलेले असे लिखित निवेदन, ज्यामध्ये भविष्यात गंभीर किंवा असाध्य आजारामुळे स्वतः निर्णय घेणे शक्य नसल्यास कोणत्या प्रकारचे वैद्यकीय उपचार घ्यायचे किंवा टाळायचे, याबाबतची इच्छा नमूद केलेली असते. अशा इच्छेचा आदर करून उपचारांबाबत पुढील निर्णय घेतले जातात.

या निर्णयामुळे राज्यातील आरोग्य व्यवस्थेत एकसमान धोरण लागू होणार असून, सरकारी आणि खासगी रुग्णालयांमध्ये गंभीर रुग्णांच्या उपचारांबाबत अधिक स्पष्ट, पारदर्शक आणि कायदेशीर प्रक्रिया राबवली जाईल. रुग्णांच्या हक्कांचे संरक्षण आणि आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात सन्मानाने निर्णय घेण्याचा अधिकार अधिक प्रभावीपणे अमलात आणण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

**खासगी रुग्णालयांनाही समान नियम**

यापूर्वी अशा प्रकरणांमध्ये सरकारी रुग्णालयांमध्ये विशिष्ट प्रक्रिया राबवली जात होती. मात्र आता खासगी रुग्णालयांनाही त्याच कायदेशीर चौकटीचे पालन करावे लागणार आहे. त्यामुळे रुग्ण कोणत्याही रुग्णालयात उपचार घेत असला तरी त्याच्यासाठी एकसमान प्रक्रिया आणि निकष लागू होतील.

**समितीची महत्त्वाची भूमिका**

राज्य सरकारच्या आदेशानुसार प्रत्येक पात्र प्रकरणाची तपासणी आणि निर्णय प्रक्रियेसाठी समितीची स्थापना करण्यात येणार आहे. संबंधित रुग्णाची वैद्यकीय स्थिती, लिव्हिंग विलची वैधता आणि सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या अटींची पूर्तता झाली आहे का, याची समितीकडून सखोल पडताळणी केली जाईल. त्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाईल.

**रुग्णांच्या हक्कांचे संरक्षण**

सरकारच्या या निर्णयामागील प्रमुख उद्देश म्हणजे रुग्णांच्या स्वायत्ततेचा आणि सन्मानाने जगण्याबरोबरच सन्मानाने मृत्यू स्वीकारण्याच्या अधिकाराचा आदर करणे.

असाध्य आजारामुळे कृत्रिम जीवनरक्षक यंत्रणांवर अवलंबून असलेल्या रुग्णांच्या बाबतीत निर्णय घेताना स्पष्ट आणि पारदर्शक प्रक्रिया उपलब्ध व्हावी, यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

**सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अंमलबजावणी**

निष्क्रिय इच्छामृत्यू आणि लिव्हिंग विलसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच काही मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. महाराष्ट्र सरकारचा हा निर्णय त्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगानेच घेण्यात आला आहे. त्यामुळे वैद्यकीय, नैतिक आणि कायदेशीर बाबींमध्ये समतोल राखत रुग्णांच्या इच्छेचा सन्मान करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## अहमदाबादमधील फटाक्यांच्या कारखान्यात भीषण स्फोट; ८ ठार, १५ जखमी

**वृत्तसंस्था, अहमदाबाद**
गुजरात येथील अहमदाबाद येथे एका फटाक्याच्या फॅक्टरीत मोठा स्फोट होऊन आग लागल्याने आठ कामगारांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना शनिवारी १८ जुलै रोजी घडली आहे. या स्फोटाचा



आवाज अनेक किलोमीटरपर्यंत ऐकू आला. त्यामुळे संपूर्ण परिसरात अफरातफर माजली. प्राथमिक माहितीनुसार या स्फोटात आठ लोकांचा मृत्यू झाला असून १५ जण जखमी झाले आहे. अहमदाबाद येथील महमूदपुरा भागातील गॅट्रेड रोड येथील टॅलेंट फायरवर्क्स फॅक्ट्रीत मोठा स्फोट होऊन आग लागली. त्यामुळे संपूर्ण भागात मोठा आवाज आल्याने घबराट पसरली. या दुर्घटनेत आता पर्यंत आठ जणांचे प्राण गेले आहेत. या स्फोटाची माहिती समजताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना झाल्या. आणि जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करीत बचाव मोहीम सुरु केले आहे.

संपादकीय लेखणीतून...

## वीजबिल माफी

महाराष्ट्र सरकारने राज्यातील बळिराजासाठी दोन अत्यंत महत्त्वपूर्ण आणि धाडसी निर्णय घेतले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी केल्यानंतर आता तब्बल ४८ हजार कोटी रुपयांची थकित वीजबिलंदेखील पूर्णपणे माफ करण्याची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा आणि थकित बिलांचा बोजा पूर्णपणे उतरवून महाराष्ट्राच्या विकासाचा एक नवीन अध्याय सुरू करणे हेच या निर्णयामागील मुख्य ध्येय असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. बळिराजाच्यावतीने मुख्यमंत्र्यांचा विशेष सत्कार करण्यात आला त्यावेळी सत्काराला उत्तर देताना त्यांनी ही घोषणा केली. राज्याची आर्थिक शिस्त राखणे नेहमीच गरजेचे असते असे ते म्हणाले. महायुतीतील सहकाऱ्यांशी झालेल्या सविस्तर आणि सकारात्मक चर्चेनंतर, शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरसकट कर्जमाफी देणे अत्यंत गरजेचे असल्याचे आम्हाला पटले आणि आम्ही हा निर्णय घेतला असे ते म्हणाले. नेहमीप्रमाणे मुख्यमंत्र्यांनी विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. काही विरोधकांना असे वाटत होते की, कर्जमाफी आणि वीजबिलाच्या मुद्यावर त्यांचे राजकीय दुकान नेहमीच चालू राहील.

मात्र, हे देवाभाऊंचे सरकार आहे आणि आम्ही जे बोलतो, ते प्रत्यक्षात करून दाखवतो, असा टोला त्यांनी लगावला. आपल्या भाषणात राजकीय हेतू बाजूला सारण्यावर भर देत मुख्यमंत्री म्हणाले की, जर आम्हाला केवळ राजकारणच करायचे असते तर आम्ही २०२९ च्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हा निर्णय घेतला असता, परंतु बळिराजाच्या कल्याणाच्या आड आम्ही कधीही राजकारण येऊ देणार नाही. राजकारण आणि निवडणुका आपल्या जागी सुरूच राहतील, पण शेतकऱ्यांच्या जीवावर आम्ही कधीही राजकारण करणार नाही. दोन लाखांपर्यंतच्या सरसकट कर्जमाफीनंतर शेतकऱ्यांवरील ४८ हजार कोटींपर्यंतची वीजबिल थकबाकी माफ करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्र्यांनी मुंबईत केली. मुख्यमंत्र्यांनी या एका निर्णयातून दोन उद्दिष्टे साध्य केली आहेत. कर्जमाफी मागोमाग आलेल्या या निर्णयाचा राजकीय लाभ मुख्यमंत्री आणि भाजपला होणार आहेच. शिवाय महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.ला (महावितरण) भांडवली बाजारात सूचिबद्ध करण्याच्या राज्य सरकारच्या प्रयत्नांनाही बळकटी मिळणार आहे. २०२१ पासून महावितरणकडे शेतकऱ्यांची वीजबिल थकबाकी आहे. आताच्या घडीला थकित वीजबिल वसुलीचा कटू निर्णय सरकारला परवडणारा नाही. महावितरणच्या बिघडलेल्या आर्थिक ताळेबंदाचा तोल सावरण्यासाठी सरकारने आधीच महावितरणचे ३२ हजार ६७९ कोटींचे कर्ज स्वतःकडे घेतले आहे. त्यात आता शेतकरी वीजबिल थकबाकी फेडण्याची जबाबदारीही सरकारने घेतल्याने महावितरणचा बिगर कृषी विभाग वेगळा करून भांडवली बाजारात सूचिबद्ध करण्याचा मार्ग प्रशस्त होईल. सध्या महावितरणचा हा विभाग नफ्यात आहे. महावितरणचे विभाजन करून कृषी ग्राहकांकरिता सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड नावाची स्वतंत्र, सरकारी मालकीची उपकंपनी स्थापन करण्यात येणार आहे. या कंपनीच्या माध्यमातून राज्यातील सुमारे ४५ लाख कृषी ग्राहकांसाठी वीजबिल माफीसारख्या योजना सुरू राहतील. शेतकऱ्यांची पाटी कोरी करून त्यावर नव्याने इतिहास लिहिता यावा याकरिता हा निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शेतीवरील उत्पादन खर्च कमी करण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून साडेसात अश्वशक्तीपर्यंतची वीजबिल माफी दिली जात आहे. त्यासाठी २५ हजार कोटींची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. यामुळे ७६ टक्के शेतक-यांना दिवसा १२ तास मोफत विजेचा लाभ मिळतो. या वर्षात १०० टक्के शेतकऱ्यांना याचा लाभ मिळेल असा सरकारचा प्रयत्न आहे.आतापर्यंतच्या कर्जमाफीपेक्षा महायुती सरकारने दिलेली कर्जमाफी अधिक व्यापक असल्याचा दावा मुख्यमंत्र्यांनी केला. मात्र, कर्जमाफी हा अंतिम उपाय नाही.

राज्यात सात ते आठ वर्षांत शेतकऱ्यांना तीन वेळा कर्जमाफी द्यावी लागत असेल तर आपल्या शेतीपुढचे प्रश्न गंभीर आहेत. शेती फायद्याची व्हायला हवी असेल तर उद्योग क्षेत्राप्रमाणे त्यात नवीन तंत्रज्ञान आणणे आवश्यक आहे. राज्यातील ५२ टक्के भाग अवर्षणप्रवण आहे. शेकडो टीएमसी पाणी सिंचन योजनांच्या अभावामुळे समुद्रात वाहून जाते. यासाठी जलयुक्त शिवार, शेततळी या माध्यमातून सिंचनावर भर दिला जातो. राज्यात २४ नवीन धरणे बांधण्याची तर १६ जुन्या धरणांची उंची वाढविण्याची योजना आहे. विदर्भ, मराठवाड्यातील एकही जिल्हा, तालुका दुष्काळात राहणार नाही. आपल्या पिढीने दुष्काळ पाहिला, परंतु आपली पुढची पिढी दुष्काळ पाहणार नाही असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. पुराचे वाया जाणारे पाणी मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राकडे वळवून राज्याचा कानाकोपरा दुष्काळमुक्त करण्याचा आपला ध्यास असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. आपण घरात बसून निर्णय घेणारे नव्हे तर मातीतल्या समस्या जाणणारा माणूस आहोत असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

# गॅरी सोबर्स-क्रिकेटच्या जगतातील महान क्रिकेटपटू काळाच्या पडद्याआड



डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

क्रिकेट जगताने आपला एक महान खेळाडू गमावला आहे. वेस्ट इंडिजचे महान अष्टपैलू खेळाडू सर गारफिल्ड सोबर्स यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या ९० व्या वाढदिवसाच्या काही दिवस आधी, २८ जुलै रोजी त्यांचे निधन झाले. सर गारफिल्ड सोबर्स हे सर गॅरी सोबर्स या नावानेही ओळखले जात होते.

सोबर्स यांना क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात परिपूर्ण खेळाडूंपैकी एक मानले जाते. त्यांनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही क्षेत्रांमध्ये एक असा दर्जा प्रस्थापित केला, जो आजही दिसून येतो. सोबर्स अशा काळात क्रिकेट खेळले, जेव्हा वेस्ट इंडिजला जागतिक क्रिकेटमधील सर्वात बलाढ्य संघांपैकी एक मानले जात होते. त्यांच्या अष्टपैलू कामगिरीमुळे त्यांना या खेळातील महान खेळाडूंमध्ये कायमचे स्थान मिळाले आहे.

### कसोटी क्रिकेटमधील उत्कृष्ट कामगिरी

सर गार्फिल्ड सोबर्स यांनी वेस्ट इंडिजसाठी ९३ कसोटी सामने खेळले आणि १६० डावांमध्ये ८,०३२ धावा केल्या. त्यांची फलंदाजीची सरासरी ५७.७८ होती, जी त्यांच्या काळासाठी अपवादात्मक मानली जात होती. आपल्या कारकिर्दीत त्यांनी २६ शतके, ३० अर्धशतके, दोन द्विशतके आणि एक त्रिशतक झळकावले. त्यांची ३६५ धावांची* सर्वोच्च धावसंख्या त्या काळी कसोटी क्रिकेटमधील एक विश्वविक्रम होती आणि ती अनेक वर्षे टिकून राहिली.

### गोलंदाजीनेही सामना जिंकून देणारे खेळाडू

सोबर्स केवळ एक महान फलंदाजच नव्हते, तर एक उत्कृष्ट गोलंदाजही होते. त्यांनी कसोटी क्रिकेटमध्ये २३५ बळी घेतले. त्यांची गोलंदाजीची सरासरी ३४.०४ आणि इकॉनॉमी रेट २.३३ होता. त्यांनी एका डावात सहा वेळा पाच बळी, आठ वेळा चार बळी घेतले आणि त्यांची सर्वोत्तम गोलंदाजी ६/७३ होती. सर गार्फिल्ड सोबर्स हे एक अप्रतिम अष्टपैलू डावखुरे गोलंदाज होते, जे जवळपास प्रत्येक प्रकारची गोलंदाजी करण्यास सक्षम होते. संघाच्या गरजेनुसार, ते डावखुरी वेगवान-मध्यमगती, डावखुरी पारंपरिक फिरकी किंवा डावखुरी अनऑर्थोडॉक्स फिरकी (चायनामन) गोलंदाजी करू शकत होते. ही विलक्षण अष्टपैलुता त्यांना क्रिकेटच्या इतिहासातील महान अष्टपैलू खेळाडूंपैकी एक बनवते.

### एकदिवसीय कारकीर्दही विशेष होती

सोबर्स आपल्या कारकिर्दीत फक्त एकच एकदिवसीय सामना खेळले. या सामन्यात त्यांनी एकही धाव केली नाही, पण एक बळी घेतला. तथापि, त्यांची संपूर्ण कारकीर्द कसोटी क्रिकेटच्या सुवर्णयुगाचे प्रतीक मानली जाते.

सर गार्फिल्ड सोबर्स यांची कसोटी आकडेवारी - ९३ - कसोटी, धावा -८०३२, फलंदाजीची सरासरीः ५७.७८, सर्वोच्च धावसंख्या -३६५, शतके - २६, अर्धशतके- ३०, बळी -२३५. गोलंदाजीची सरासरी -३४.०४, सर्वोत्तम गोलंदाजी - ६/७३, पाच बळी - ६ वेळा.

### सर गार्फिल्ड सोबर्स, वेस्ट इंडिजचे माजी कर्णधार

सर गार्फिल्ड सोबर्स यांनी वेस्ट इंडिजचे कर्णधारपदही भूषवले आणि कॅरिबियन तसेच जगभरातील क्रिकेटपटूंच्या अनेक पिढ्यांना प्रेरणा दिली. क्रिकेटमधील त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना 'नाइट' पदवीने सन्मानित करण्यात आले. विस्डेनच्या 'शतकातील क्रिकेटपटू'मध्ये त्यांचा समावेश करण्यात आला आणि त्यांना आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये स्थान देण्यात आले. हे सन्मान क्रिकेटवर त्यांनी पाडलेल्या व्यापक आणि चिरस्थायी प्रभावाची साक्ष देतात.

अनेक क्रिकेट तज्ञ आणि चाहत्यांच्या मते, सर गार्फिल्ड सोबर्स यांच्यापेक्षा अधिक परिपूर्ण क्रिकेटपटू आजवर कोणीही झालेला नाही. त्यांच्या पदार्पणानंतर सहा दशकांहून अधिक काळ लोटला असला तरी, जगातील प्रत्येक महान अष्टपैलू खेळाडूचे मूल्यमापन करण्यासाठी सर गार्फिल्ड सोबर्स हे एक मापदंड बनून राहिले आहेत.

### क्रिकेट जगताचे कधीही भरून न येणारे नुकसान

सर गार्फिल्ड सोबर्स यांना क्रिकेटचे पहिले महान आधुनिक अष्टपैलू खेळाडू मानले जाते. त्यांची फलंदाजीतील गुणवत्ता, गोलंदाजीतील विविधता आणि मैदानातील चपळाई यामुळे ते त्यांच्या काळातील सर्वात प्रभावशाली खेळाडूंपैकी एक बनले. त्यांच्या निधनाने, क्रिकेटने एक अशी महान व्यक्ती गमावली आहे, ज्यांची कामगिरी येणाऱ्या पिढ्यांसाठी कायमच प्रेरणास्रोत राहील. ते केवळ एक महान फलंदाज आणि गोलंदाजच नव्हते, तर क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात परिपूर्ण क्रिकेटपटू मानले जातात.

महान ऑस्ट्रेलियन फलंदाज सर डॉन ब्रॅडमन यांनी एकदा त्यांना "फाइव्ह-इन-वन क्रिकेटर" म्हटले होते. याचे कारण स्पष्ट होतेः ते एक जागतिक दर्जाचे फलंदाज होते, डावखुरी वेगवान-मध्यम, ऑर्थोडॉक्स फिरकी, चायनामन (डावखुरी मनगटी फिरकी) गोलंदाजी करू शकत होते आणि एक उत्कृष्ट क्षेत्ररक्षकही होते. क्रिकेटच्या इतिहासात एकाच खेळाडूमध्ये असे गुण क्वचितच पाहायला मिळाले आहेत.

### सहा बोटांसह जन्म, वयाच्या पाचव्या वर्षी वडिलांचे निधन

२८ जुलै, १९३६ रोजी बाबाडोसच्या ब्रिजटाऊन येथे जन्मलेल्या सोबर्स यांचे बालपण संघर्षांनी भरलेले होते. त्यांच्या प्रत्येक हाताला सहा बोटे होती. लहानपणी त्यांनी आपली अतिरिक्त बोटे काढून टाकली आणि त्याच आत्मविश्वासाने पुन्हा क्रिकेट खेळायला सुरुवात केली. पण त्याच्या आयुष्यातील सर्वात मोठा धक्का त्याला वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी बसला. त्याचे वडील, जे मर्चंट नेव्हीमध्ये कार्यरत होते, दुसऱ्या महायुद्धादरम्यान एका जर्मन पाणबुडीच्या हल्ल्यात मारले गेले. वडिलांच्या मृत्यूनंतर, त्याच्या आईने एकटीने कुटुंबाची जबाबदारी सांभाळली.

समुद्रकिनाऱ्यावर आपल्या भावांसोबत क्रिकेट खेळणे हेच त्याचे पहिले प्रशिक्षक बनले. कोणतेही औपचारिक प्रशिक्षण नसतानाही, त्याची प्रतिभा इतकी विलक्षण होती की त्याने लहान वयातच फुटबॉल, बास्केटबॉल आणि गोल्फमध्ये बार्बाडोसचे प्रतिनिधित्व केले.

### वयाच्या १६ व्या वर्षी प्रथम-श्रेणी क्रिकेट, वयाच्या १७ व्या वर्षी कसोटी क्रिकेट

सोबर्सची प्रतिभा बराच काळ दडलेली राहिली. वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी त्याने बार्बाडोससाठी प्रथम-श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. अवघ्या १४ महिन्यांनंतर, वयाच्या १७ व्या वर्षी, त्याने वेस्ट इंडिजच्या कसोटी संघात स्थान मिळवले. सुरुवातीला, त्याची प्रामुख्याने गोलंदाज म्हणून निवड झाली आणि तो खालच्या क्रमांकावर फलंदाजी करत असे, पण येत्या काही वर्षांत जगाने त्याच्यातील महान फलंदाजाला ओळखले.

### ३६५ धावा... ज्यांनी इतिहास बदलला

१९५८ मध्ये पाकिस्तानविरुद्ध खेळलेल्या खेळीने त्यांना अमर केले. तेव्हा केवळ २१ वर्षांचे असलेल्या सोबर्स यांनी आपले पहिले कसोटी शतक झळकावले, पण ते तिथेच थांबले नाहीत. त्यांनी ३६५ धावा* करून कसोटी क्रिकेटमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्येचा विक्रम प्रस्थापित केला. हा विक्रम ३६ वर्षे अबाधित राहिला आणि क्रिकेटच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ खेळींपैकी एक मानला जातो.

मित्र गमावला, पण खचले नाहीत

१९५९ मध्ये, सोबर्स एका भीषण रस्ते अपघातात सापडले. त्यांचे जवळचे मित्र आणि वेस्ट इंडिजचे सहकारी क्रिकेटपटू कोली स्मिथ यांचा या अपघातात मृत्यू झाला. या घटनेने त्यांना आतून हादरवून सोडले, पण त्यांनी हार मानली नाही. ते म्हणाले की, आता ते केवळ स्वतःसाठीच नाही, तर आपल्या दिवंगत मित्रासाठीही खेळतील. यानंतर, त्यांनी बॅट आणि बॉल या दोन्हीमध्ये अशी कामगिरी केली की ज्यामुळे ते महान खेळाडूंच्या पंक्तीत जाऊन बसले.

### एका षटकात सहा षटकार मारणारा पहिला फलंदाज

१९६८ मध्ये, इंग्लिश काउंटी क्रिकेटमध्ये नॉटिंग हॅमशायरकडून खेळताना सोबर्सने इतिहास रचला. त्याने ग्लॅमॉर्गनचा गोलंदाज मॅल्कम नॅशने टाकलेल्या एका षटकातील सर्व सहा चेंडूंवर सहा षटकार मारले. प्रथम-श्रेणी क्रिकेटमध्ये असे करणारा तो पहिला फलंदाज ठरला.

### कर्णधार बनले, पिढ्यांना प्रेरणा दिली

१९६५ मध्ये, त्यांची वेस्ट इंडिज संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती झाली. त्यांनी ३९ कसोटी सामन्यांमध्ये संघाचे नेतृत्व केले आणि कॅरिबियनमधील तरुणांसाठी आशा व प्रेरणेचे प्रतीक बनले. त्यांचा प्रभाव केवळ विक्रमांपुरता मर्यादित नव्हता. त्यांनी हे सिद्ध केले की एका लहान बेटावर जन्मलेला मुलगासुद्धा जगातील महान खेळाडू बनू शकतो.

### त्यांची महानता दर्शवणारे सन्मान

क्रिकेटमधील त्यांच्या उत्कृष्ट योगदानाबद्दल, त्यांना 'सर' (नाइटहूड) या पदवीने सन्मानितकरण्यात आले. विस्डेनच्या 'शतकातील क्रिकेटपटू' यादीत त्यांचा समावेश झाला आणि त्यांना आयसीसीच्या 'हॉल ऑफ फेम'मध्येही स्थान मिळाले. आजही जगातील प्रत्येक महान अष्टपैलू खेळाडूची तुलना सर गार्फिल्ड सोबर्स यांच्याशी केली जाते.

### प्रेम, कुटुंब आणि वैयक्तिक जीवन

सोबर्स यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दलही बरीच चर्चा झाली. भारतीय अभिनेत्री अंजू महेंद्रू यांच्यासोबतचे त्यांचे नाते चर्चेचा विषय होते, जरी त्यांनी कधी लग्न केले नाही. त्यानंतर त्यांनी १२ सप्टेंबर १९६९ रोजी ऑस्ट्रेलियाच्या प्रुडन्स (प्रू) किर्बी यांच्याशी लग्न केले. त्यांना मॅथ्यू आणि डॅनियल हे दोन मुलगे होते आणि त्यांनी जिनिव्हिव्ह नावाच्या एका मुलीला दत्तकही घेतले होते. नंतर त्यांचा घटस्फोट झाला, पण त्यांचे त्यांच्या कुटुंबासोबतचे नाते घट्ट राहिले.

### एका युगाचा अंत

क्रिकेटने अनेक महान फलंदाज आणि गोलंदाज घडवले आहेत, पण सर गॅरी सोबर्स यांच्यासारखा खेळाडू पुन्हा क्वचितच पाहायला मिळेल. त्यांनी हे सिद्ध केले की महानता केवळ विक्रमांनी नव्हे, तर खेळाला नव्या उंचीवर नेऊन मिळवली जाते. शुक्रवारी त्यांचे निधन हे एका युगाचा अंत आहे, पण येत्या काळात क्रिकेटमधील प्रत्येक अष्टपैलू खेळाडूचे मूल्यमापन एकाच मापदंडाने केले जाईल ते म्हणजे सर "गॅरी" सोबर्स.

क्रिकेट जगताच्या या महान अष्टपैलू खेळाडू भावपूर्ण श्रद्धांजली!

- ९०९६३७२०८२

# नागरिकत्व ठरवणे हा निवडणूक आयोगाचा अधिकार नाही!

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीतून वगळले जाणे किंवा त्याच्याकडे मतदार ओळखपत्र नसणे म्हणजे त्याची भारतीय नागरिकता संपणे नव्हे, असा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयामुळे देशातील लाखो नागरिकांना, विशेषतः सीमावर्ती भागातील आणि गरीब कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. न्यायालयाने स्पष्ट शब्दांत निवडणूक आयोगाच्या अधिकारांची 'लक्ष्मणरेषा' आखून दिली आहे.

पश्चिम बंगालमधील एका 'संदिग्ध भारतीय नागरिक' प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निवडणूक आयोगाच्या अधिकारांची मर्यादा तसेच कायद्याची आणि संविधानाची स्थिती पूर्णपणे स्पष्ट केली. न्यायालयाने सांगितले की, आयोगाचे मूळ कर्तव्य म्हणजे निवडणूक आयोगाचे काम फक्त आणि फक्त मतदार यादी तयार करणे, त्यावर नियंत्रण ठेवणे, त्याचे व्यवस्थापन आणि देखरेख करणे एवढेच आहे. आयोग स्वतःच्या अधिकारात कोणालाही भारताचा नागरिक किंवा परदेशी (गैर-नागरिक) घोषित करू शकत नाही.नागरिकत्व ठरवण्याचा




अधिकार आयोगाला नाही. लवादाचा निर्णय अंतिम असा की, जर एखाद्या सक्षम लवादाने एखाद्या व्यक्तीला संशयास्पद नागरिकांच्या यादीत टाकण्यास नकार दिला असेल, तर निवडणूक आयोग त्याविरुद्ध जाऊन स्वतः कोणताही निर्णय घेऊ शकत नाही. अशा वादाच्या प्रसंगी आयोगाला हे प्रकरण थेट केंद्रीय गृह मंत्रालयाकडे पाठवावे लागेल, कारण नागरिकत्व बहाल करणे किंवा नाकारणे हा संवैधानिक अधिकार केवळ केंद्र सरकारकडेच आहे.

मतदार यादीत नाव नसल्यास रेशन आणि सरकारी योजना नाकारता येणार नाहीत. या कायदेशीर लढाईदरम्यान न्यायालयाने एका अत्यंत संवेदनशील मानवी आणि सामाजिक पैलूवर तीव्र चिंता व्यक्त केली. न्यायालयासमोर सादर करण्यात आलेल्या याचिकेत असे धक्कादायक वास्तव मांडण्यात आले होते की, ज्या लोकांची नावे कोणत्या ना कोणत्या कारणाने मतदार यादीतून बाद झाली आहेत, त्यांना स्थानिक प्रशासनाकडून जाणीवपूर्वक त्रास दिला जात आहे.

भ्रष्ट आणि संवेदनशील नसलेल्या सरकारी यंत्रणेकडून मतदार यादीत नाव नसल्याची ढाल बनवून गरिबांना, सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS / रेशन)

अन्नपूर्णा योजना (वृद्ध आणि असहाय्य नागरिकांसाठीची अन्न सुरक्षा योजना) इतर अत्यंत आवश्यक कल्याणकारी योजना, मूलभूत योजनांपासून वंचित ठेवले जात असल्याचे आरोप याचिकेत होते. यावर न्यायालयाने कडक भूमिका घेत स्पष्ट केले की, 'मतदार यादीत नाव नसणे म्हणजे नागरिकत्व संपणे नव्हे. त्यामुळे केवळ या कारणास्तव कोणत्याही नागरिकाला त्याच्या जगण्याच्या मूलभूत अधिकारांपासून आणि हक्काच्या अन्नापासून वंचित ठेवता येणार नाही.'

सर्वोच्च न्यायालयाने या जनहित याचिकेचे गांभीर्य ओळखून यावर सविस्तर सुनावणी घेण्याचे मान्य केले आहे. प्रशासकीय त्रुटींमुळे गरिबांचे होणारे शोषण थांबवण्यासाठी न्यायालय काय पावले उचलणार, याकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. या प्रकरणाची पुढील अंतिम आणि निर्णायक सुनावणी २५ ऑगस्ट रोजी निश्चित करण्यात आली आहे.

- ९५६१५९४३०६

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# पावसाच्या सरींत चिंब झाली विठ्ठलभक्ती

## ४ हजार बाल वारकऱ्यांची भव्य दिंडी, लेझीम, फुगड्या, रिंगण आणि हरिनामाच्या गजराने शहर झाले भक्तिमय





**लेझीम, फुगड्या आणि हरिनामाचा गजर**

शंकरनगर ते बजाजनगर मार्ग रेखीव रांगोळ्यांनी सजविण्यात आला होता. रिमझिम पावसातही दिंडीचा उत्साह ओसंडून वाहत होता. काही विद्यार्थी लेझीमच्या तालावर थिरकत होते, तर मुली फुगड्या खेळत विठ्ठलनामाचा गजर करीत होत्या. "विठ्ठला... विठ्ठला..."च्या जयघोषाने परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. मार्गभर ठिकठिकाणी दिंडीचे पूजन करून पुष्पवृष्टी करण्यात आली.

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त शनिवारी नागपुरात साक्षात पंढरपूर अवतरल्याचा भावस्पर्शी अनुभव नागरिकांना आला. रिमझिम पावसाच्या सरी अंगावर झेलत शंकरनगर चौकापासून बजाजनगर येथील ज्ञानेश्वर मंदिरापर्यंत निघालेल्या ४ हजारांहून अधिक बालवारकऱ्यांच्या दिंडीने संपूर्ण परिसर विठ्ठलमय झाला. टाळ-मृदुंगाच्या गजरात, लेझीम, फुगड्या, रिंगण आणि अखंड हरिनामाच्या जयघोषात विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेचा जिवंत आविष्कार घडविला.

महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायातील संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या विचारांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी तसेच मराठी संस्कृती, परंपरा आणि आध्यात्मिक मूल्यांचे संस्कार नव्या पिढीत रुजावेत, या उद्देशाने नूतन भारत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, अभ्यंकर नगर नागपूर, नागपूर महानगरपालिका, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद नागपूर, मराठी भाषा ज्ञानसंवर्धन प्रतिष्ठान, सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट आदी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने या भव्य शालेय वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले.

दिंडीच्या प्रारंभी पालखीतील विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्ती, संतांच्या प्रतिमा आणि ग्रंथांचे स्थायी समिती अध्यक्षा शिवानी दाणी यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. त्यानंतर दिंडीला प्रारंभ झाला. दिंडीच्या अग्रभागी रथात विराजमान विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशातील चिमुकल्यांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

यावेळी महापौर नीता ठाकरे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, उपसंचालक माधुरी सावरकर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अनिल दहिफळे, मराठी भाषा ज्ञानसंवर्धन प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवींद्र काटोलकर, धरमपेठ झोनचे सभापती धनश्री गावंडे, शिक्षण सभापती महानगरपालिका संतोषदेवी लद्धा नगरसेवक दिलीप दिवे, रितेश गावंडे, वर्षा चौधरी ज्ञानेश्वर मंदिराचे अध्यक्ष अशोक गुजरकर, कार्याध्यक्ष अविनाश संगवई, भारतीय विद्या प्रसारक संस्थेचे सचिव रमेश बक्षी, सहसचिव अतुल गाडगे, नूतन भारत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. वंदना बडवाईक, सती माता एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा डॉ मंदा उमाटे, मृणाल काटोलकर, भाग्यश्री पवार, डॉ. शालिनी तेलरांधे, कविता पवार, कल्पना वांगे, यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**ज्ञानेश्वर मंदिरात आरतीने समारोप**

बजाजनगर येथील ज्ञानेश्वर मंदिरात श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पूजन व आरतीने दिंडीचा समारोप झाला. त्यानंतर नूतन भारत विद्यालयाच्या प्रांगणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. तसेच सहभागी शाळांना सन्मानचिन्हे प्रदान करून या सांस्कृतिक उपक्रमाची सांगता करण्यात आली.

**५० हून अधिक शाळांचा उत्स्फूर्त सहभाग**

या शालेय वारकरी दिंडीत नागपूर शहरातील ५० हून अधिक शाळांनी सहभाग नोंदविला. ४ हजारा विद्यार्थी, सुमारे ५०० शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी अभ्यंकर नगर बजाज नगर परिसरातील शेकडो नागरिक या दिंडीत सहभागी झाले. महाराष्ट्राच्या वैभवशाली वारकरी परंपरेची ओळख विद्यार्थ्यांना करून देणारा हा उपक्रम सर्वांच्याच कौतुकाचा विषय ठरला.

## प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय गायक महेश काळे यांच्या अभंग कार्यशाळेचे ७ ऑगस्ट रोजी आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

एल.ए.डी.अँड श्रीमती आर.पी.कॉलेज फॉर वूमन, शंकरनगर, नागपूर येथील संगीत विभाग आणि इंडियन क्लासिकल म्युझिक अँड आर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय गायक महेश काळे यांच्या 'अभंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा विशेष संवादात्मक (इंटरएक्टिव्ह) स्वरूपाची असून सहभागी विद्यार्थ्यांना आणि संगीतप्रेमींना महेश काळे यांच्याकडून प्रत्यक्ष अभंग गायनाची कला शिकण्याची संधी मिळणार आहे. ही कार्यशाळा महेश काळे स्कूल ऑफ म्युझिक यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत असून 'अंकुर सीड्स' यांचे प्रायोजकत्व लाभले आहे.

हि कार्यशाळा शुक्रवार, ७ ऑगस्ट रोजी, सायंकाळी ६ ते ७.३० यावेळेत, एल.ए.डी. अँड श्रीमती आर.पी.कॉलेज फॉर वूमन, शंकरनगर, नागपूर येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये होणार आहे. कार्यशाळा सर्वांसाठी खुली असून भारतीय शास्त्रीय संगीताचे विद्यार्थी, संगीतप्रेमी तसेच ७ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या सर्व इच्छुकांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी मिशन बहुजनचे धरणे आंदोलन, केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



नीट पेपर लीक, परीक्षा प्रक्रियेतील अनियमितता आणि विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायाच्या निषेधार्थ दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला मिशन बहुजन, नागपूरच्या वतीने जाहीर समर्थन देण्यात आले.

यासोबतच लडाखचे प्रख्यात पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या आंदोलनालाही पाठिंबा दर्शवत शनिवारी राजे शिवाजी चौक, हिवरी नगर येथे धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलन कर्त्यांनी केंद्र सरकारने विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करून विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा प्रस्थापित करावा आणि पेपर लीकसाठी जबाबदार असलेल्या दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी केली.

आंदोलनादरम्यान सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीबाबतही तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली. भारत सरकारने त्यांच्या आंदोलनाची तातडीने दखल घेऊन संवादाच्या माध्यमातून त्यांच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा तसेच त्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घ्यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

मिशन बहुजनच्यावतीने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नीट पेपर लीक प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच नीटसह सर्व पेपर लीक प्रकरणांची केंद्रीय अन्वेषण विभागामार्फत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

या आंदोलनात राहुल मोरे, राकेश धारगावे, मनोज गजभिये, सत्यवान मेश्राम, विनोद गजभिये, चंद्रमणी नाईक, जयदीप चिवंडे, महेंद्र कठाने, दीपा डोंगरे, उज्वला डोंगरे, ममता कांबळे, नंदा डोंगरे, पुष्पा वासनिक, भारती सहारे, दुर्गा नाईक, उषा इंगळे, माया उमक, सुनीता लोखंडे, कल्याणी शेंडे, निशा शेंडे, मनोज मेश्राम, प्रतिमा जांबुले, सुमित झोडे, छाया नाईक, सुनिता भोईर, मनीषा गवई, साधना धुनिवन, कविता गवई, प्रकाश राहुल, दिपक रंगारी, अरविंद रंगारी, ईश्वर रजक, दिलीप रामटेके, पुंडलिक नाईक, डॉ. बी. सी. रंगारी, यू.के. मानवटकर, ओमप्रकाश सोमकुवर, सुरेंद्र नागदेवते, सतीश देशपांडे, राजेंद्र गोंडाने, ममता गोंडाने, मृणाली गोंडाने, सुरेश ए.पाटील, बी.बी.शोभले व बी. कांभळे यांच्यासह मिशन बहुजनचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्येष्ठ समाजवादी नेते, माजी आमदार डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन

**वृत्तसंस्था, पुणे**

ज्येष्ठ समाजवादी नेते, पुरोगामी विचारवंत, 'युवक क्रांती दला'चे (युक्रांद) संस्थापक आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन झाले, ८५ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांना मधुमेहाचा त्रास होता आणि अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना पुण्यातील एरंडवणे येथील खासगी रुग्णालयात नेले होते. मात्र, उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. डॉ. कुमार सप्तर्षी हे महाराष्ट्रातील एक प्रमुख पुरोगामी विचारवंत होते. लोकशाही मूल्यांचा आग्रह धरत असतानाच सामाजिक न्यायाच्या लढ्यात ते कायम अग्रेसर असत. विधिमंडळ सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले असून आपल्या कायाची वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनानंतर समाजावादी विचारवंत, पत्रकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली जात आहे.



कुमार सप्तर्षी यांचा मुलगा कबीर सप्तर्षी इंग्लंडहून आल्यानंतर सोमवारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होतील, अशी माहिती निकटवतीर्यांनी दिली. सोमवारी सकाळी दहा ते बारा वाजेपर्यंत त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी कोथरुडमधील गांधी भवन इथं ठेवलं जाईल, त्यानंतर अंत्यसंस्कार होतील, अशी देखील माहिती संबंधितांनी दिली. दरम्यान, आमदार रोहित पवार यांनी कुमार सप्तर्षी यांना सोशल मीडियातून श्रद्धांजली वाहिली आहे.

## पीएमएआय अंतर्गत आधार नगरीतील ८०० रहिवासी तीन वर्षांपासून पिण्याच्या पाण्यापासून वंचित

### पत्रकार परिषदेत शासनाकडे न्यायाची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पंतप्रधान आवास योजना अंतर्गत पीपीपी मॉडेलमध्ये उभारण्यात आलेल्या धानोली गट ग्रामपंचायत हद्दीतील डोंगरगाव जवळील आधार नगरी- १ व आधार नगरी- २ या गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये राहणारे सुमारे ८०० रहिवासी गेल्या तीन वर्षांपासून पिण्याच्या पाण्याच्या मूलभूत सुविधेपासून वंचित असल्याचा गंभीर आरोप पत्रकार परिषदेत करण्यात आला.

शासनाने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न झाल्याने संतप्त नागरिकांनी पत्र परिषद घेऊन आपल्या न्याय्य हक्कासाठी आवाज उठविला.

यावेळी युगल किशोर पडोळे यांनी सांगितले की, पंतप्रधान आवास योजने अंतर्गत या प्रकल्पाला मंजुरी देताना जिल्हा परिषद, नागपूर यांनी जलजीवन मिशन योजनेद्वारे पाणीपुरवठा करण्यास मान्यता देत आवश्यक ना हरकत प्रमाणपत्र देखील दिले होते. त्यानुसार रहिवाशांना नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात आजपर्यंत या प्रकल्पाला कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्यात आलेला नाही. सन २०२३ मध्ये, सुमारे ४०० कुटुंबांना घरांचा ताबा देण्यात आला. त्यानंतर २०२६ मध्ये, आणखी ४०० कुटुंबांना घरे देण्यात आली.

सध्या या परिसरात जवळपास ८०० नागरिक वास्तव्यास असूनही त्यांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. डोंगरगाव जवळील सुमारे तीन किलोमीटर अंतरावरील (कान्होली) पाणीपुरवठा योजनेतून या प्रकल्पाला पाणी जोडणी देण्याचे नियोजन होते, मात्र ते अद्याप आले नाही. पत्रपरिषदेत सांगितले की, माधव इन्फ्राचे प्रोप्रायटर दीपक निलावार यांनी रहिवाशांच्या अडचणी लक्षात घेऊन अनेकदा शासन व लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा केला. त्यांनी महाराष्ट्र राज्याचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्याची विनंती केली.

तसेच शासनाकडे निवेदन सादर करून आधार नगरीतील रहिवाशांचा प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी केली. माधव इम्फ्रा चे दीपक निलावार यांनी स्वतःच्या प्रयत्नातून काही काळ दररोज १३ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवला होता. मात्र, काही दिवसांपूर्वी हा पुरवठा बंद झाल्याने परिसरात चार ते पाच दिवस पिण्याचे पाणीच उपलब्ध नव्हते. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला. रहिवाशांच्या विनंतीनंतर निलावार यांनी पुन्हा पुढाकार घेत नदीच्या काठी वीहीर सुद्धा खोदली गेली परंतु त्या विहिरीचे पाणी आटून गेले.

त्यांच्या प्रयत्नातून दररोज तीन टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला. मात्र, ही केवळ तात्पुरती व्यवस्था असून शासनाने कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी करण्यात आली. पत्रकार परिषदेत नागरिकांनी स्पष्ट केले की, पिण्याचे पाणी हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे.

शासनाने घरे देताना पाणीपुरवठ्याचे आश्वासन दिले होते, परंतु ३ वर्षांनंतरही ते पूर्ण झालेले नाही. त्यामुळे शासनाने तातडीने कायमस्वरूपी जलपुरवठा योजना कार्यान्वित करून आधार नगरी-१ व २ मधील सर्व रहिवाशांना नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

यावेळी दीपक निलावार यांनी उ.ड. म्हाडा नागपूर, सचिव गृह विभाग मुंबई, आमदार समीर मेघे, माहिती जिल्हाधिकारी नागपूर, पाणी विभाग आणि गट ग्रामपंचायत ठराव व पत्र असे निवेदन देऊन आधार नगरीतील रहिवाशांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी शासनस्तरावर हस्तक्षेप करण्याची विनंती केली असून, या प्रश्नाकडे त्वरित लक्ष देण्याची मागणी करण्यात आली. याप्रसंगी जवळ जवळ २० ते ३० नागरिकांची उपस्थिती होती.

**थोडक्यात**

### डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त नागपूर महापालिकेत अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या ५७ व्या स्मृतिदिनानिमित्त नागपूर महानगर पालिकेत त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी नागपूर महानगरपालिका आयुक्त डॉ. विपिन इटनकर यांनी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. आपल्या साहित्य, लोककला आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून वंचित, शोषित आणि कष्टकरी समाजाला आवाज देणाऱ्या डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या कायार्चा यावेळी गौरवपूर्वक उल्लेख करण्यात आला.

या अभिवादन कार्यक्रमाला दुर्बल घटक समितीच्या अध्यक्षा कु. लक्ष्मीताई हत्तीठेले, महेंद्र प्रधान, चंद्रकांतजी वानखेडे, रमेशजी पाडण, बंटीभाऊ इंगळे तसेच नागपूर महानगर पालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांनी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक योगदानाचे स्मरण करून त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यांच्या कार्यातून समाजात समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाची प्रेरणा आजही मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### पारडी येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी तथा उडान फाउंडेशन, आर्णी शाखा पारशीवणी यांच्या संयुक्त विद्यमाने पारशिवनी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, पारडी येथील विद्यार्थ्यांना शालेय बॅग वाटप कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात शब्दसुमनाने व भारतीय संविधानाच्या सामूहिक वाचनाने करण्यात आली. या कार्यक्रमाला सहयोग बँकेचे सहाय्यक शाखा व्यवस्थापक राहुल राऊत, पारडी ग्रामपंचायत सरपंच स्वातीताई घारड,.पोलीस पाटील, समाजसेवक देविदास घारड रामराव घारड यांची प्रमुख शालेय बॅगचे वाटप करण्यात आले .

यावेळी सहयोग बँकेचे सहाय्यक शाखा व्यवस्थापक राहुल राऊत सर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत, "शिक्षण हीच खरी संपत्ती असून शिक्षणाच्या बळावरच जीवनात मोठे यश आणि उच्च पद प्राप्त करता येते," असा प्रेरणादायी संदेश दिला. स्वातीताई घारड यांनी विद्यार्थ्यांना चांगले संस्कार, शिस्त, प्रामाणिकपणा आणि नियमित शिक्षण यांचे महत्त्व सांगत उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा दिली. राहुल राऊत यांनी सहयोग बँकेच्या विविध बचत योजना, ठेवी, कर्ज सुविधा आणि समाजाभिमुख उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. तसेच शिक्षण, बचत आणि सामाजिक बांधिलकी यांचा परस्पर संबंध स्पष्ट करून विद्यार्थी व पालकांना प्रोत्साहित केले. यावेळी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक नंदकिशोर बावनकुळे गावातील ज्येष्ठ नागरिक, शिक्षकवृंद, पालक, सहयोग बँकेचे सर्व कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, सामाजिक उत्तरदायित्व जपणे आणि उज्वल भविष्य घडविणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

### लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठेंना लहुजी शक्ती सेनेकडून विनम्र अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिना निमित्त लहुजी शक्ती सेने च्यावतीने त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक, साहित्यिक व परिवर्तनवादी कार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. या अभिवादन कार्यक्रमाला लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश सचिव रविंद्र खडसे, नागपूर जिल्हाध्यक्ष अंकुश बावणे, नागपूर जिल्हा कार्याध्यक्ष रमेश पाडण, नागपूर शहराध्यक्ष सागर (दादा) जाधव, विदर्भ उपाध्यक्ष महेश खोडके, विदर्भ सरचिटणीस कृष्णाजी खोडके, प्रवीण डोंगरे, राज्य कार्यकारिणी सदस्या श्रीमती वानखेडे, नागपूर महिला शहराध्यक्षा जयश्री इंगोले, सोनू वानखेडे, इंदिराबाई वाघमारे यांच्यासह लहुजी शक्ती सेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे स्मरण करून समाजातील वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांच्या न्यायहक्कासाठी त्यांच्या कायार्तून प्रेरणा घेऊन सामाजिक परिवर्तनासाठी कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

थोडक्यात

## न्यू एनर्जी बहुउद्देशीय संस्थेचा २४ वा स्थापना दिवस उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

न्यू एनर्जी बहुउद्देशीय संस्थेचा २४ वा स्थापना दिन विविध समाजोपयोगी उपक्रमांसह उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी संस्थेच्या गेल्या २४ वर्षांतील बालसंगोपन, दत्तकग्रहण, महिला सक्षमीकरण, निराधार व अनाथ बालकांचे संगोपन तसेच शिक्षण क्षेत्रातील कार्याचा आढावा घेण्यात आला. संस्थेच्या माध्यमातून हजारो बालके व महिलांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळाल्याची माहिती देण्यात आली. स्थापना दिनानिमित्त क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेतील विद्यार्थिनी कु. चेतना बारापात्रे हिने इयत्ता दहावीत ७७ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल तिचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच तिच्या इयत्ता अकरावीच्या संपूर्ण शिक्षणाचा खर्च संस्था उचलणार असल्याची घोषणा करण्यात आली.

कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी, लाभार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन पूजा झोडे यांनी केले तर आभार किशोरी ईटनकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रितेश कणार्से, अर्चना तागडे, नैना तामगाडे, समीक्षा मेश्राम, नीलिमा आवळे, तुळसा रामटेके व कुसुम चौधरी यांनी अथक परिश्रम घेतले. स्थापना दिनाच्या समारंभाला संस्थेचे पदाधिकारी, संस्था योजनेचे कर्मचारी तसेच सुमारे २०० महिला व पुरुष उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांसाठी स्वरुची भोजनाची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर स्नेहमेळावा व संगीत कार्यक्रमाने समारंभाची सांगता झाली.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे स्मृतिदिनानिमित्त वाडीत अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शनिवारी सकाळी ११ वाजता वाडी येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक युवा मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मंडळाचे अध्यक्ष गुरुदास बावणे यांनी भूषविले. वाडी नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी गौरव गाडगे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. यावेळी गौरव गाडगे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य व शोषित-पीडितांच्या जीवनाला वाचा फोडणाऱ्या त्यांच्या लेखनाच्या योगदानावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला नगर परिषदेच्या स्वच्छता व पाणीपुरवठा अभियंता सुषमा भालेकर, लेखापरीक्षक अतुल सरदार, लेखापाल दर्शन बिराजदार, अग्निशमन अधिकारी भाग्यश्री टोंगसे, स्वच्छता निरीक्षक रंजित सोनेकर, स्वच्छता निरीक्षक मुकेश महातो, स्वच्छता ब्रँड अँम्बेसेडर नरेशकुमार चव्हाण, मयूर कांबळे तसेच युवराज मेश्राम उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नरेशकुमार चव्हाण यांनी केले.

## मारोती नगरातील एसआयआर विशेष शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

### १ हजारांहून अधिक नागरिकांनी पूर्ण केली प्रक्रिया



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

मारोती नगर परिसरात आयोजित करण्यात आलेल्या एसआयआर विशेष नागरिक सहाय्यता शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नगरसेवक राजेश थोराने यांच्या पुढाकाराने आयोजित या शिबिरामध्ये दिवसभरात १ हजारांहून अधिक नागरिकांनी एयआयआर प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली. या शिबिराचा लाभ मारोती नगर, शिवशक्ती नगर, स्मृती नगर, धम्मकीर्ती नगर, त्रिलोक नगर आणि सुरक्षा नगर परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने घेतला. नागरिकांना आवश्यक कागदपत्रांची पडताळणी, अर्ज भरणे, ऑनलाइन नोंदणी तसेच विविध तांत्रिक बाबींमध्ये स्वयंसेवकांनी मार्गदर्शन केल्यामुळे संपूर्ण प्रक्रिया जलद व सुलभ झाली. यावेळी नगरसेवक राजेश थोराने म्हणाले, "प्रत्येक पात्र नागरिकाची रक्ष्प्रक्रिया कोणत्याही अडचणीशिवाय पूर्ण व्हावी, हा या शिबिरामागील मुख्य उद्देश आहे. नागरिकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हे शिबिर यशस्वी ठरले असून, गरज भासल्यास भविष्यातही अशा प्रकारची शिबिरे आयोजित करण्यात येतील." शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यरत स्वयंसेवक, कार्यकर्ते आणि सहकार्य करणाऱ्या सर्व नागरिकांचे आभार यावेळी व्यक्त करण्यात आले. नागरिकांच्या मोठ्या सहभागामुळे हे शिबिर परिसरातील लोकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरल्याचे आयोजकांनी सांगितले.

# सामाजिक उपक्रम 'अनोखा बाजार'चे २२ जुलै रोजी उद्घाटन

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष उपक्रम




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सोबत पालकत्व प्रकल्प, दि फ्रेण्ड्स को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. यांच्या संयुक्त विद्यमाने, श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट व सोबत पालकत्व प्रकल्पाचे अध्यक्ष तथा माजी आमदार संदीप जोशी यांच्या प्रेरणेतून 'अनोखा बाजार' या आगळ्यावेगळ्या सामाजिक उपक्रमाला प्रारंभ करण्यात येत आहे.

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'अनोखा बाजार' या उपक्रमाचे उद्घाटन बुधवार, दि. २२ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता तात्या टोपे हॉल, तात्या टोपे नगर, नागपूर येथे होत आहे. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद (आयएएस) यांची उपस्थिती राहील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोबत पालकत्व प्रकल्पाचे अध्यक्ष संदीप जोशी राहतील तर दि फ्रेण्ड्स को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. चे अध्यक्ष सुभाष मंडलेकर यांची यावेळी उपस्थिती राहील.

घरातील वापरण्यायोग्य परंतु अतिरिक्त असलेल्या वस्तूंना गरजूंपर्यंत पोहोचविण्याचा हा अभिनव प्रयत्न आहे. अनेक घरांमध्ये सायकली, अभ्यासाची टेबल-खुर्ची, पुस्तके, संगणक, कपाट, भांडी, कपडे, खेळणी तसेच इतर अनेक वस्तू वापरात नसतानाही पडून असतात. अशा वस्तू एखाद्या कुटुंबासाठी उपयुक्त ठरू शकतात. 'ज्यांच्याकडे जास्त आहे त्यांनी द्यायचे आणि ज्यांना गरज आहे त्यांनी सन्मानाने घ्यायचे' या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम समाजात माणुसकीची भावना अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करणार आहे.

या उद्घाटन सोहळ्यास तसेच उपक्रमात सहभागी होण्यासाठी आपल्या कुटुंबीय, मित्रपरिवार व शेजाऱ्यांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहून या माणुसकीच्या उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**दर महिन्याला भरेल 'अनोखा बाजार'**

हा सामाजिक उपक्रम शहराच्या विविध भागात राबविण्यात येणार आहे. दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी सायंकाळी ५ ते ९ या वेळात हा 'अनोखा बाजार' भरणार आहे. ज्यांना अनोखा बाजारमधील वस्तू न्यायच्या आहेत त्यांना सुरुवातीला १०० रुपये सेवा शुल्क देऊन फॉर्म भरावा लागेल. त्यानंतर एका व्यक्तीला एकावेळी केवळ दोन वेगवेगळ्या वस्तू अगदी निःशुल्क घरी घेऊन जाता येतील.

ज्या दात्यांना आपल्या घरातील वापरण्यायोग्य स्थितीतील वस्तू 'अनोखा बाजार' मध्ये ठेवायच्या असतील त्यांनी पंचायतन अपार्टमेंट, प्लॉट नं. १७६, फ्लॅट नं. १०४, आरपीटीएस रोड, लक्ष्मीनगर, नागपूर येथे त्या जमा कराव्या. दर रविवारी हे कलेक्शन सेंटर सकाळी ९ ते १ या वेळात सुरू राहील.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजक प्रणव घुगरे असून सहसंयोजक म्हणून ज्योत्स्ना कुन्हेकर, संदीप मानकर, मंजुषा जोशी, आनंद टोळ, प्रकाश रथकंठीवार, प्रणय मोहबंसी, गजानन निशितकर, कौशिक जोशी आणि वंदना शर्मा कार्यरत आहेत. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ९८२३०४३१३३, ८६००२७८८८८ किंवा ९५११८५४०८१ या क्रमांकांवर संपर्क साधावा. पत्रकार परिषदेला प्रणव घुगरे यांनी संबोधित केले. यावेळी संदीप मानकर, मंजुषा जोशी, प्रकाश रथकंठीवार, गजानन निशितकर, कौशिक जोशी आणि वंदना शर्मा यांची उपस्थिती होती.

## अवघ्या १३ वर्षांच्या तीन क्रीडाप्रेमी मुलांनी उभारली विदर्भातील सर्वात मोठी 'रॅली रॉयल पिकलबॉल चॅम्पियनशिप २०२६'

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

***वय हे केवळ एक आकडा असतो, जिद्द, नियोजन आणि नेतृत्व असेल तर मोठी स्वप्नेही साकार होऊ शकतात, याचे प्रेरणादायी उदाहरण***




नागपुरातील अवघ्या १३ वर्षांच्या तीन क्रीडाप्रेमी मुलांनी घालून दिले आहे. या तिघांनी पुढाकार घेत 'रॅली रॉयल पिकलबॉल चॅम्पियनशिप २०२६' या विदर्भातील सर्वात मोठ्या फ्रँचायझी- आधारित पिकलबॉल स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले आहे.

नागपुरातील पिकल को. ठक्कळ स्विमिंग पूल येथे १६ ते १९ जुलै दरम्यान सुरू असलेल्या चार दिवसीय स्पर्धेत १० फ्रँचायझी संघ आणि १०० हून अधिक नोंदणीकृत खेळाडू सहभागी झाले असून दररोज दुपारी ४ वाजल्यापासून सामने खेळविले जात आहेत. स्पर्धेत व्यावसायिक खेळाडू, महिला खेळाडू, युवा खेळाडू तसेच राखीव खेळाडूंचा समावेश असून लीग फेरीनंतर अव्वल संघांमध्ये बाद फेरीचे सामने रंगणार आहेत. या स्पर्धेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची संकल्पना, नियोजन आणि व्यवस्थापन अवघ्या तेरा वर्षांच्या तीन उत्साही क्रीडाप्रेमी मुलांनी केले आहे. पिकलबॉल या वेगाने लोकप्रिय होत असलेल्या खेळाला व्यावसायिक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, नवोदित खेळाडूंना संधी मिळवून देणे आणि मध्य भारतात या खेळाचा प्रसार करणे हा या तिघांचा प्रमुख उद्देश आहे.

त्यांच्या नेतृत्व, नियोजन आणि व्यवस्थापन कौशल्यामुळे ही स्पर्धा चर्चेचा विषय ठरली आहे. ही स्पर्धा ऑल इंडिया पिकलबॉल असोसिएशन आणि पिकलबॉल असोसिएशन विदर्भ यांच्या मार्गदर्शनाखाली होत असल्याने स्पर्धेला अधिकृत मान्यता आणि विश्वासार्हता लाभली आहे. स्पर्धेला कॉर्पोरेट क्षेत्रातूनही मोठा प्रतिसाद मिळाला आहे. कॅलिबर हे Powered By Partner, एस. डी. कन्स्ट्रक्शन्स हे Title Sponsor तर बोथरा अँड बागमार ज्वेलर्स हे Co-Title Sponsor म्हणून सहकार्य करत असून इतर अनेक सहप्रायोजकांनीही स्पर्धेला पाठबळ दिले आहे.

स्पर्धेच्या आयोजनामुळे नागपुरात पिकलबॉल बाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून क्रीडाप्रेमी, कुटुंबीय आणि नागरिक मोठ्या संख्येने सामने पाहण्यासाठी उपस्थित राहत आहेत. एवढ्या लहान वयात इतक्या मोठ्या क्रीडा स्पर्धेचे यशस्वी आयोजन करून या तीन मुलांनी केवळ विदर्भाचाच नव्हे तर संपूर्ण राज्यातील युवा पिढीसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या उपक्रमाचे, क्रीडा क्षेत्रातून आणि समाजातील विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

## कोर्टात नोकरीला असलेल्या मामानेच भाचाला १९ लाखांना फसवले

**वृत्तसंस्था, बीड**

जिल्ह्यात गेल्या काही महिन्यात गुन्हेगारीच्या घटनांची साखळीच पाहायला मिळत असून एकामागोमाग एक गुन्हे उघडकीस येत आहेत. त्यामध्ये, मारहाण, फसवणूक, खुनाचा प्रयत्न, खून यासह विविध प्रकारचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मात्र, आता चक्क मामानेच भाचाला फसवल्याची घटना उघडकीस आली आहे.

महसूल विभागात लिपिक पदावर नोकरी लावण्याचे आमिष दाखवून एका मामाने आपल्या सख्ख्या भाच्याला तब्बल १९ लाख रुपयांना गंडविल्याचा धक्कादायक प्रकार केज तालुक्यात उघडकीस आला. परभणी येथील न्यायालयात लिपिक पदावर कार्यरत असलेल्या मामानेच हा फसवणुकीचा डाव रचल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. वाढती बेरोजगारी आणि सरकारी नोकरीत कमी होणाऱ्या संधीमुळे अनेकदा युवक नोकरीच्या अमिषाला बळी पडतात. सरकारी खात्यात नोकरी लावतो म्हणून युवकांची आर्थिक फसवणूक केली जाते. त्यानंतर, नोकरीचे आमिष दाखवणारे गायब होतात. आधीच नोकरीचा पत्ता नाही, त्यातच आर्थिक भुर्दंड बसल्याने तरुणाई आणखी तणावात जाते. मात्र, बीड जिल्ह्याच्या केजमध्ये चक्क मामानेच आपल्या भाचाला तब्बल १९ लाख रुपयांना फसवल्याची घटना उघडकीस आली आहे.

परभणी न्यायालयात लिपिक असलेल्या आरोपी दगडू हंगरगे याने फिर्यादी भाचा अमोल मधुकर चिगुरे याला विश्वासात घेऊन महसूल विभागात लिपिक तथा महसूल सहाय्यक पदावर नोकरीचं आमिष दाखवलं. त्यासाठी, मामाने भाच्याकडे १९ लाख रुपयांची मागणी केली.

# भारत ज़िंदाबाद रहा है, भारत ज़िंदाबाद रहेगा' 'सदियों तक आबाद रहा है, सदियों आबाद रहेगा'

### ताजबाग के ऑल इंडिया मुशायरे में शायर व सांसद इमरान प्रतापगढ़ी ने बांधा समा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर**

बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह के १०४वें सालाना उर्स के अवसर पर ताजबाग में हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट के तत्वावधान में ऑल इंडिया मुशायरे का आयोजन किया गया. इसमें बड़ी संख्या में जायरीन शामिल हुए. मुशायरे में प्रमुख रूप से मशहूर शायर व राज्यसभा सांसद इमरान प्रतागढ़ी सहित शायर हाशिम फीरोजाबादी, हामिद भुसावली, आरिफ सैफी, मोहन मुन्तज़िर, अफजल इलाहाबादी, शबीना अदीब, सबा बलरामपुरी और सरिता जैन ने अपनी रचनाएँ पढ़ी. वरिष्ठ शायर नदीम फरोख ने निजामत की.



इस अवसर पर मुख्य रूप से हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट के चेयरमैन प्यारे जिया खान, सचिव ताज अहमद राजा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र जिचकार, ट्रस्टी हाजी फारूकभाई बावला, हाजी इमरान खान ताजी, गजेंद्रपाल सिंह लोहिया, मुस्तफाभाई टोपीवाला उपस्थित थे. गयासुद्दीन अशरफी ने मंच संचालन किया. मुशायरे में मुख्य आकर्षण रहे मशहूर शायर और सांसद इमरान प्रतापगढ़ी ने अपनी आवाज और जज्बाती कलाम से हजारों की तादाद में मौजूद जायरीन और श्रोताओं को मंत्रमुग्ध कर दिया. बाबा ताजुद्दीन के आस्ताने के इस ऐतिहासिक आयोजन में उन्होंने देश की गंगा-जमुनी तहजीब, सामाजिक एकता और वैश्विक शांति पर कई दिल छू लेने वाले शेर और नज्में पेश कीं.

मुशायरे में उमड़े भारी जनसैलाब के सामने इमरान प्रतापगढ़ी ने जब अपनी मशहूर नज्म 'लब पे आती है दुआ बनके तमन्ना मेरी' के नए मिसरे पढ़े, तो पूरा पंडाल तालियों की गड़गड़ाहट से गूंज उठा. इमरान प्रतागढ़ी ने केवल बातों से सियासत करने वाले राजनेताओं पर शायराना तंज कस्ते हुए कहा की 'दुनिया थोड़ी जजबातों से चलती है, मेरे रब की खैरातों से चलती है. अपने यहाँ कुछ ऐसे सियासतदान भी हैं, जिनकी सियासत बस बातों से चलती है'. इमरान प्रतागढ़ी ने देशप्रेम के जज्बे को शायरी में मिश्रित करते हुए कहा की 'सदियों तलक आबाद रहा है, सदियों तलक आबाद रहेगा, भारत ज़िंदाबाद रहा है, भारत ज़िंदाबाद रहेगा' 'नफरत के अंधियारे में हम सब जुगनू बन जाएँगे, हिंदू, मुस्लिम, सिख, ईसाई एक बाजू बन जाएँगे' 'मुल्क की मिट्टी जिस दिन फिर से जान की कुबार्नी माँगे, भगत सिंह तुम बन जाना और हम टीपू बन जाएँगे' इसी तर इमरान प्रतागढ़ी ने मुशायरे में आपरी रचना 'जंग पर जंग हो, फिर जंग की तैयारी हो, इतनी मोहलत भी नहीं है कि अजादारी हो' 'कुछ भरोसा ही नहीं है कि कहाँ बम बरसे, बच्चियाँ पढ़ने गईं और वहाँ बम बरसे" पेश की और इस दर्दनाक जुल्म पर चुप रहने वालो को नसीहत देते हुए बच्चियों के परिवारो और उनके अपनों का दर्द ब्यान किया.

**'जो खानदानी रईस है वो मिजाज रखते हैं नर्म अपना'**

वरिष्ठ शायर शबीना अदीब द्वारा पढ़ी गई रचना 'जो खानदानी रईस है वो मिजाज रखते हैं नर्म अपना, तुम्हारा लहजा बता रहा है अभी यह दौलत नई नई है' पर तालियों से मुशायरा गूँज उठा. इसी तरह मुशायरे में शायर हाशिम फीरोजाबादी ने अपनी शायरी 'डिग्री पाकर देश के युवा दर दर क्यू है भटक रहे, 'हमें बताओ युवा हमारे फांसी पर क्यों लटक रहे' से सिस्टम की नाकामियों पर साहित्यिक अंदाज में प्रहार किया. इसी तरह शायरा सबा बलरामपुरी ने अपनी रचना 'ऐसा मुझे लगता है गर्दिश में सितारा है, 'फहरिस्त में झूटों को एक नाम तुम्हारा है' 'तुम आग लगाओगे, हम आग बुझाएंगे' 'वो काम तुम्हारा था' 'यह काम हमारा है' से प्रेम और सौहार्द्र का सन्देश दिया.

वहीं शायरा सरिता जैन ने अपनी रचना 'मोहब्बत पर हुकूमत है तुम्हारी, 'मगर सिक्का हमारा चल रहा है' पेश कर शमां बांधा. इस दौरान शायर हामिद भुसावली, आरिफ सैफी, मोहन मुन्तज़िर, अफजल इलाहाबादी , ने भी अपनी रचनाओं से महफिल में वाहवाही लूटी.

**ताजबाग में शिक्षा के लिए सांसद निधि से १ करोड़ दूंगा: इमरान प्रतापगढ़ी**

मुशायरे के दौरान इमरान प्रतागढ़ी ने कहा की ताजबाग ट्रस्ट बहुत जल्दी एक तालीमी इदारा खड़ा करने जा रहा है. उन्होंने कहा की वे जानते है की ताजबाग ट्रस्ट के पास बजट की कोई कमी नहीं है, अल्लाह ने बहुत दिया है इस ट्रस्ट को. लेकिन वे यहाँ ऐलान करते है की आप जिस दिन यह तालीमी इदारा खड़ा करना शुरू करेंगे, वे अपनी सांसद निधि से १ करोड़ उस तालीमी इदारे के लिए जरूर देंगे.

शायर व सांसद इमरान प्रतापगढ़ी ने शिक्षा के क्षेत्र में ताजबाग ट्रस्ट को इस बड़े सहयोग की घोषणा की. उन्होंने कहा कि शिक्षा क्षेत्र में जब भी नए शैक्षणिक संस्थान की शुरूआत होगी, वे अपनी सांसद निधि से १ करोड़ की राशि जरूर देंगे. इसके साथ ही उन्होंने जानकारी दी कि यवतमाल में बन रहे यूपीएससी कोचिंग सेंटर के लिए भी उनके द्वारा १ करोड़ की राशि दी जा चुकी है, जिसका निर्माण कार्य तेजी से चल रहा है. प्रतापगढ़ी ने शिक्षा के महत्व पर जोर देते हुए कहा कि यह पूरा क्षेत्र तालीम के लिए बेहतरीन काम कर रहा है ।

थोडक्यात

## अग्रवाल विज्ञान महाविद्यालयात रोजगार मेळावा संपन्न




**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**

प्रताप मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट गोंदिया द्वारा संचलित शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय सालेकसा येथे कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग, जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस. नारायण मूर्ती तर प्रमुख अतिथीपदी योगेंद्र शेंडे सहाय्यक आयुक्त युवा कौशल्य व रोजगार एवं उद्योजकता विभाग गोंदिया तसेच प्रवीण आत्राम कौशल्य विकास अधिकारी आणि विजयजी फुंडे नगराध्यक्ष सालेकसा हे उपस्थित होते. आपल्या प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी या रोजगार मेळाव्याची पार्श्वभूमी स्पष्ट करून कार्यक्रमाचा उद्देश काय आहे हे सर्वांना सांगितले.

आपल्या मनोगतामध्ये योगेंद्रजी शेंडे व विजयाची पुंडे यांनी विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करून स्वतःचा विकास करावा असे आवाहन केले. त्यानंतर या मेळाव्यासाठी उपस्थित असलेल्या कंपन्यांच्या प्रतिनिधींनी सर्व विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन त्यांना त्यांच्या करिअर संदर्भात मार्गदर्शन केले. सध्याच्या काळात अनेक विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतात परंतु त्यांना नोकरी किंवा रोजगार मिळत नसल्याचे चित्र पहावयास मिळत आहे, त्याच अनुषंगाने या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या रोजगार मेळाव्यामध्ये २१५ विद्यार्थ्यांनी आपली नाव नोंदणी करून वेगवेगळ्या कंपन्यांच्या मुलाखती दिल्या त्यापैकी काही विद्यार्थ्यांची प्राथमिक स्तरावर निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रणाली शिंगाडे तर आभार प्रदर्शन डॉ. प्रवीण पाटील यांनी केले. या रोजगार मेळावयाच्या यशस्वितेसाठी संस्था अध्यक्ष विशालजी अग्रवाल सचिव प्रफुलजी अग्रवाल यांच्या मार्गदर्शनामध्ये प्राचार्य प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक प्रयत्न केले.

## मानसिक तणावातून अपंग ई-रिक्षाचालकाची गळफास घेऊन आत्महत्या

### चणकापूर येथील घटना; घरगुती वादातून नैराश्य वाढल्याचा प्राथमिक अंदाज

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**



चणकापूर येथे राहणाऱ्या मानसिक तणावग्रस्त अपंग ई-रिक्षाचालकाने शनिवारी दुपारी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. सुनील दुर्योधन कुनभरे (वय ४०) असे मृताचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुनील कुनभरे हे विवाहित असून त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी व आई असा परिवार आहे. सुमारे दोन वर्षांपूर्वी खापरखेडा रेल्वे क्रॉसिंगजवळील नाग मंदिर परिसरात ई-रिक्षा चालवत असताना त्यांचा अपघात झाला होता. या अपघातात त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली होती. उपचारानंतर पायात संसर्ग वाढल्याने त्यांचा एक पाय निकामी झाला होता. त्यानंतर ते अपंगत्वामुळे मानसिक तणावात असल्याचे सांगितले जाते.

दरम्यान, त्यांना दारूचे व्यसन लागले होते. गेल्या दोन-तीन दिवसांपासून दारूच्या कारणावरून घरात सातत्याने वाद होत होता. रात्री-अपरात्री ई-रिक्षा घेऊन बाहेर जात असल्याने कुटुंबीयांनी रिक्षेची बॅटरी काढून ठेवली होती. याच कारणावरून घटनेच्या दिवशी सकाळीही घरात वाद झाल्याची माहिती आहे. शनिवारी दुपारी पत्नी स्वयंपाकाच्या कामासाठी बाहेर गेली होती, मुले शाळेत गेली होती, तर आई शेजारी गेली होती. दुपारी सुमारे २ वाजताच्या सुमारास सुनील यांनी घराचा दरवाजा बंद करून हॉलमध्ये गळफास घेतला. काही वेळाने आई घरी परतल्यानंतर दरवाजा उघडत नसल्याने शेजाऱ्यांच्या मदतीने दरवाजा उघडण्यात आला. त्यावेळी ते गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. घटनेची माहिती मिळताच खापरखेडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला असून, पुढील तपास खापरखेडा पोलीस करीत आहेत.

## अकोल्यात बनावट नोटा चालनात आणणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश, ५०० रुपयांच्या १९४ नोटा जप्त

**वृत्तसंस्था, अकोला**

अकोल्यात बनावट नोटा चालणात आणणाऱ्या रॅकेटचा पदार्फाश करण्यात आला आहे. अकोला पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखाने भारतीय चलनातील ५०० रुपयांच्या 'नकली नोटा' रॅकेटमध्ये ३ जणांना अटक केली आहे. अकोला जिल्ह्यातील गुडधी आणि मुर्तीजापुरात पोलिसांनी या नकली नोटा पकडल्या आहेत. तब्बल ५०० रुपयांच्या एकूण ९७ हजार रुपयांच्या नकली नोटा जप्त केल्या आहेत. पाचशे रुपयांच्या या १९४ नोटा चलनात आणण्याचा प्रयत्न होत होता, मात्र ऐनवेळी पोलिसांनी चंदन धांडोरे नामक तरुणाला अटक केली. तो मार्केटमध्ये ५०० रुपयांच्या बनावट नोटा घेऊन फिरत होता. त्यानंतर मूर्तिजापुरातून अन्य दोन जणांना अटक केलीय. या कारवाईत पोलिसांनी तब्बल पाचशे रुपयांच्या १९४ बनावट नोटा जप्त केल्या. या सर्व नकली नोटा बुलढाणा जिल्ह्यातून अकोल्यामध्ये आणण्यात आल्याचं पोलिसांच्या तपासात समोर आलंय. चंदन भिमराव धांडोरे, जहीरोद्दीन जबीरोद्दीन आणि विठ्ठल वारोकार असे अटक करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. यातील दोघेजण अकोला शहरालगत असलेल्या गुडधी येथील रहिवासी आहेत. तर अन्य एक मुर्तीजापुर तालुक्यातील रहिवासी आहे.

# मनपाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांना रेनकोट व छत्रीचे मोफत वितरण

### मनपा व रोटरी क्लब ईशान्यचा संयुक्त उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमधील दहावीच्या वर्गातील ११०० विद्यार्थ्यांना अमृतछाया अभियानाअंतर्गत रेनकोट व छत्रीचे वितरण महापौर निता ठाकरे, आमदार कृष्णा खोपडे व शिक्षण विशेष समिती सभापती संतोषदेवी लढ्ढा यांच्या हस्ते करण्यात आले.

नागपूर महानगरपालिका व रोटरी क्लब ईशान्यच्या संयुक्त विद्यमाने हा अमृतछाया अभियान कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित केला होता. यावेळी उपमहापौर लिला हाथीबेड उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, नेहरुनगर झोन सभापती ज्योती देवघरे, शिक्षण उपसभापती भारती बुंदे, नगरसेविका वैशाली उदापूकर, नगरसेविका वर्षा डोंगरे, सहायक आयुक्त नरेंद्र बावनकर, शिक्षणाधिकारी वंदना महाजन, रोटरी क्लबचे निलेश राठी, धीरज साबू उपस्थित होते.

**सामाजिक बांधिलकीची शिकवण : महापौर ठाकरे**

यावेळी बोलताना महापौर निता ठाकरे यांनी रोटरी क्लबने सामाजिक बांधिलकी मानून या उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल आभार व्यक्त केले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी सुद्धा जाणीव ठेऊन परीक्षांमध्ये यश संपादन करावे, असे आवाहन केले व विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीची शिकवण मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल पासून दूर राहण्यासाठी आवाहन केले. त्यांनी सांगितले की, दहावीच्या विद्यार्थ्यांनी काळजी पूर्वक शिक्षणाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्यांनी शिक्षण समिती सभापती संतोष देवी लढ्ढा यांचे मनपा शाळेत अभिनव उपक्रम आयोजित करण्यासाठी अभिनंदन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना रेनकोट आणि छत्री वितरण करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ ईशान्य यांचे आभार मानले.

शिक्षण समिती सभापती संतोष देवी लढ्ढा यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात महिला शिक्षणाची प्रेरणा सावित्रीबाई फुले यांच्या महिला शिक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, आजच्या काळात मुलांनी संवेदनशील होण्याची आवश्यकता आहे. यातून चांगल्या चरित्राचे निर्माण होते. त्यांनी रोटरी क्लब ऑफ ईशान्य चे विद्यार्थ्यांना रेनकोट आणि छत्री वितरण करण्यासाठी आभार मानले. रोटरी क्लब ऑफ ईशान्यचे अध्यक्ष निलेश राठी यांनी आपल्या भाषणात सामाजिक बांधिलकीतून मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना रेनकोट आणि छत्रीचे वितरण करण्यात आले आहे. कार्यक्रमांचे संचालन शुभांगी पोहरे यांनी केले.

आभार प्रदर्शन शिक्षणाधिकारी वंदना महाजन यांनी केले. या प्रसंगी शिक्षण विभागाचे सुभाष उपासे, प्रशांत टेंभुर्णे, विनय बगळे यांच्यासह इतर उपस्थित होते. मुख्य कार्यक्रमानंतर करियर सल्लागार प्रणाली सरोदे यांनी मुलांना दहावी नंतर काय करायचे याचे उत्तम मार्गदर्शन केले.

## सोनम वांगचुक प्रकरणाच्या निषेधार्थ उमरेडमध्ये विद्यार्थ्यांचे आमरण उपोषण

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**




उमरेडमध्ये स्थानिक विद्यार्थ्यांनी आमरण उपोषण सुरू केले असून, या आंदोलनाला शहरातील नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. उपोषणात अर्षव शिंगणे, कौशिक भेंडे, पृथ्वी झाडे, देवांश कुकुडकर, तुषार शिंगणे, निलय गुजरकर, रजत गायगावली, तक्ष नागदेवते, ओम कुहीकर, सौम्या देवगडे, श्रावण संत, प्रतीक्षा गेडाम, कोहिनूर माटे तसेच त्यांचे पालक लीना झाडे, प्रसन्ना गुजरकर, सुरेखा मेश्राम सहभागी झाले आहेत.

दिल्लीतील जंतर-मंतर येथे पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना दीर्घकाळ सुरू असलेल्या आमरण उपोषणादरम्यान पोलिसांनी रुग्णालयात हलवल्यानंतर देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, त्याच पार्श्वभूमीवर नागपूर जिल्ह्यातील उमरेड शहरात विद्यार्थी, पालक, शिक्षक, सामाजिक संघटना आणि विविध राजकीय पक्ष एकत्र येत आंदोलन तीव्र करण्यात आले आहे.

उपोषणकर्त्यांनी सांगितले की, शांततापूर्ण आंदोलन हा भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेला मूलभूत लोकशाही अधिकार आहे. आंदोलनकर्त्यांना जबरदस्तीने हटविणे किंवा त्यांचे आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न हा लोकशाही मूल्यांवर आघात असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. दिल्लीतील घटनेनंतर देशभरात विद्यार्थी संघटना आणि विविध सामाजिक गटांकडून निषेध व्यक्त केला जात आहे. दरम्यान, दिल्ली पोलिसांनी सोनम वांगचुक यांना त्यांच्या प्रकृतीची स्थिती गंभीर झाल्याने न्यायालयाच्या निर्देशांनुसार आणि वैद्यकीय सल्ल्यानुसार रुग्णालयात दाखल केल्याचे स्पष्ट केले आहे. दुसरीकडे आंदोलनाशी संबंधित काही प्रतिनिधींनी ही कारवाई जबरदस्तीची असल्याचा आरोप केला असून, या संपूर्ण प्रकरणामुळे देशभरात तीव्र चर्चा सुरू झाली आहे.

**आंदोलनकर्त्यांच्या मागण्या**

जंतर-मंतर येथे घडलेल्या संपूर्ण घटनेची निष्पक्ष व स्वतंत्र न्यायालयीन चौकशी करण्यात यावी. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. शांततापूर्ण आंदोलन आणि उपोषण करण्याच्या संविधानिक अधिकाराचे संरक्षण करण्यात यावे. आंदोलनकर्त्यांवर कोणत्याही प्रकारची दडपशाही होणार नाही, याची केंद्र सरकारने हमी द्यावी. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर तातडीने सकारात्मक संवाद सुरू करून योग्य निर्णय घ्यावा. लोकशाही मूल्यांचा सन्मान राखत नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत.

उमरेड शहरातील विद्यार्थी, पालक, शिक्षक, विविध कोचिंग क्लासेस, सामाजिक संघटना तसेच विरोधी पक्षांनी २० जुलै २०२६ रोजी दुपारी १ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, पोलिस स्टेशन,उमरेड येथून उपविभागीय अधिकारी कार्यालयापर्यंत निषेध करून निवेदन देण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

या ठिकाणी सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला सरकारने जोर जबरदस्तीने थांबविले या घटनेचा निषेध करण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनांकडे दुर्लक्ष करून दडपशाहीची भूमिका कायम राहिल्यास देशभरातील विद्यार्थी आणि नागरिकांचा असंतोष अधिक तीव्र होऊ शकतो. त्यामुळे केंद्र सरकारने संवादाचा मार्ग स्वीकारून परिस्थिती शांततापूर्ण पद्धतीने हाताळावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## महत्त्वाच्या परिसरात जवळ कचऱ्याचे जंगल!

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-प्रकाश टेंभरे**



तालुका महाराष्ट्राच्या अंतिम टोकावर असल्यामुळे या भागात अनेक कामे निकृष्ट दर्जाचे करण्यात येतो, याकडे शासन प्रशासन मात्र 'अंधेरी नगरी चौपट राजा' या म्हणीप्रमाणे काम करत राहतात. एकीकडे शासन स्वच्छतेच्या नावाने कोट्यवधी रुपये खर्च करत आहे ते फक्त कागदावरच म्हणावे लागेल. अनेक महत्त्वाच्या ठिकाणी दुर्गंधी व अस्वच्छता रखडलेला पडलेला दिसत आहे.

नगरपंचायत सालेकसाजवळ पोलीस स्टेशनच्या परिसरात विद्युत डीपी जवळ व मानगड पुलाच्या जवळ कचऱ्याचे जंगल झालेले आहे. या ठिकाणी लोकांचे रात्रंदिवसा खूप येणं जाणं राहते. लहान चिमुकले आपल्या शाळेत येणे जाणे करतात. आता पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे या ठिकाणी साप विंचवांचे वास्तव्य राहू शकतात त्यामुळे कुणालाही इजा करू शकतात.

एकीकडे शासन पोंगा फुकून सांगतात की, साचलेला पाणी ठेवू नका. अनेक ठिकाणी पाणी साचलेला आहे. आताच मानागड कालव्याचे काम जेसीपी मशीनद्वारे आले ते मात्र थातूरमातूर झालेला आहे असे दिसून येत आहे.

अनेक दिवसापासून मानागड कालव्यात पाणी साचलेले आहे. बरेच दिवस झाल्यामुळे या पाण्यात डासांच्या पादुर्भाव वाढत चाललेला आहे त्यामुळे लोकांना रोग होऊ शकतो. हे पाणी लवकरात लवकर निष्कर्षित करावे अशी मागणी लोकांनी केलेली आहे.

> विद्युत प्रवाहाचे डीपी असल्यामुळे तिथला कचरा काढण्यात आला नाही. संबंधित विभागाला त्याची तक्रार केलेली आहे.
>
> **- नगराध्यक्ष विजय फुंडे**
>
> मानगड कालव्यात बऱ्याच वषार्पासून सफाई झालेली नव्हती घनदाड कचरा असल्यामुळे सफाई करण्यात आली आहे. यानंतर कालव्याचे लेवल दुरुस्ती करण्यात येणार आहे.
>
> **- महेश भाबांडे, मानागड कालवा शाखा अभियंता**



## मिशन ऑरेंज सिटी रामगिरी परिसरात मुख्यमंत्री यांनी लावले संत्रावृक्ष

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मिशन ऑरेंज सिटी उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज रामगिरी निवासस्थानी संत्रावृक्षाचे झाड लाऊन मोहिमेचा शुभारंभ केला. यावेळी महापौर नीता ठाकरे, आमदार परिणय फुके, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी, महाराष्ट्र टाइम्सचे निवासी संपादक अतुल पांडे तसेच अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. मिशन ऑरेंज सिटी हा उपक्रम दैनिक महाराष्ट्र टाईम्स या ग्रुप तर्फे राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्यात.

## 'मर्म बंधातली ठेव...'द्वारे गाजलेल्या नाटकांतील एकपात्री स्वगतांचे प्रभावी सादरीकरण

### विदर्भ साहित्य संघाच्या 'साहित्य कट्टा' उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भ साहित्य संघाच्या 'साहित्य कट्टा' या उपक्रमांतर्गत शनिवारी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, शंकरनगर चौक येथे 'मर्म बंधातली ठेव...' हा एकपात्री नाट्यप्रयोगांचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. विविध गाजलेल्या मराठी नाटकांतील प्रभावी स्वागतांचे सादरीकरण करून नाट्यकलावंतांनी प्रेक्षकांना रंगभूमीच्या सुवर्णकाळाची अविस्मरणीय सफर घडवली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नाट्यकर्मी प्रभाकर आंबोणे होते, तर बापू चनाखेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विदर्भ साहित्य संघाच्या उपाध्यक्ष माधुरी साकुळकर व बाळ कुळकर्णी आणि शुभदा फडणवीस यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.







देवेंद्र दोडके यांनी राम गणेश गडकरी यांच्या 'एकच प्याला' मधील सादर केलेल्या 'सुधाकर'ला प्रेक्षकांनी भरभरून टाळ्यांनी प्रतिसाद दिला, प्रभाकर अंबोणे यांनी वि. वा. शिरवाडकर यांच्या 'महंत' मधील 'राजा', मीना देशपांडे यांनी सुरेश देशपांडे यांच्या 'सर्कस वाला' मधील 'आजीबाई', मुकुंद वसुले यांनी राम गणेश गडकरी यांच्या 'एकच प्याला' मधील 'तळीराम', श्रद्धा तेलंग यांनी मनिष चौधरी यांच्या 'लेखिका' मधील 'जाई', नीलकांत कुलसंगे यांनी 'मोहित चटोपाध्याय' यांच्या 'राजरक्त' मधील 'प्रथम', संयुक्ता थोरात यांनी पु. ल. देशपांडे यांच्या 'फुलराणी' मधील 'फुलराणी', मोहन पांडे यांनी विश्राम बेडेकर यांच्या 'वाजे पाऊल अपुले' मधील 'व्यंकट वकील', देवेंद्र लुटे यांनी त्यांच्याच 'शुभमंगल सावधान' मधील 'गुरुमाऊली', अशोक आग्रे यांनी वि. वा. शिरवाडकर 'नटसम्राट' मधील 'अप्पा साहेब बेलवलकर', विनोद तुंबडे यांनी वसंत कानेटकर यांच्या 'मत्सगंध' मधील 'पितामाभीष्म', वैदेही चवरे यांनी सुप्रिया अय्यर यांच्या 'शुद्ध वेदणाची गाणी' मधील 'अवंतिका', दीपलक्ष्मी भट यांनी मंजूश्री सरदेशपांडे यांच्या 'कर्मयोगिनी अहिल्याबाई' मधील 'अहिल्याबाई', प्रणाली राऊत यांनी महेश एलकुंचवार यांच्या 'धर्मपुत्र' मधील 'बाई', गीता काळे व विनोद काळे यांनी युवराज प्रधान यांच्या 'संतान' मधील 'केशवराव आणि जानकी' या भूमिका साकारत एकाहून एक सरस एकपात्री प्रयोग सादर केले. अंमर मसराम यांनी शेवटी 'भैरवी' सादर करून कार्यक्रमाची सांगता केली.

संपूर्ण कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त आणि भरभरून प्रतिसाद दिला. सूत्रसंचालन डॉ. पराग घोंगे यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन सुप्रसिद्ध अभिनेत्री आसावरी तिडके-गडेकर यांनी केले.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : रविवार, १९ जुलै २०२६

थोडक्यात

## नक्षलविरोधी दमन सप्ताहानिमित्त सालेकसा येथे जनजागृती रॅली उत्साहात संपन्न




**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजु फुंडे**

नक्षलविरोधी दमन सप्ताहानिमित्त आज सालेकसा पोलीस स्टेशनच्या वतीने जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. नक्षलवादाविरोधात जनतेमध्ये जागृती निर्माण करणे, शांतता, कायदा व सुव्यवस्था तसेच सामाजिक ऐक्याचा संदेश देणे हा या रॅलीचा प्रमुख उद्देश होता. सकाळी ८.३० वाजता सालेकसा पोलीस स्टेशन येथून रॅलीला प्रारंभ झाला. ही रॅली बाजार चौक, गांधी चौक, सुभाष चौक, बस स्टॉप, बहेकार वाडा, कुंभार मोहल्ला, सिंगल टोली या प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत पुन्हा पोलीस स्टेशन येथे दाखल झाली. सकाळी ९.३० वाजता रॅलीची सांगता करण्यात आली. रॅलीमध्ये सुमारे ७० शालेय विद्यार्थी, ९ शिक्षक, पोलीस स्टेशनमधील १६० प्रशिक्षणार्थी, १५ ग्रामस्थ तसेच पोलीस स्टेशनचे ३ अधिकारी आणि २० पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. सहभागी विद्यार्थी व पोलीस जवानांनी हातात नक्षलविरोधी जनजागृतीचे फलक व बॅनर घेऊन नक्षलवादाविरोधी घोषणाबाजी केली. त्यामुळे संपूर्ण शहरात जनजागृतीचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत नक्षलवादमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी पोलिसांच्या या उपक्रमाचे स्वागत केले. अशा जनजागृती अभियानातून युवक व विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, देशप्रेम आणि शांततेचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## MS-CIT ला प्रतिष्ठेचा 'SKOCH' पुरस्कार, गोंदिया जिल्ह्यात 'चला बनवूया महाराष्ट्र अकरेडी' अभियानाची सुरुवात



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजु फुंडे**

महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेडच्या सिल्व्हर ज्युबिली वर्षानिमित्त राज्यातील सर्वाधिक लोकप्रिय डिजिटल साक्षरता अभ्यासक्रम MS-CIT ला देशातील प्रतिष्ठेचा SKOCH Award २०२६ प्रदान करण्यात आला आहे. डिजिटल साक्षरता, कौशल्य विकास आणि सामाजिक परिवर्तन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा राष्ट्रीय सन्मान देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर 'चला बनवूया महाराष्ट्र अकरेडी' या राज्यव्यापी जनजागृती अभियानाचा शुभारंभ गोंदिया जिल्ह्यात करण्यात आला आहे. या अभियानाअंतर्गत विद्यार्थी, शिक्षक, पालक, सरकारी कर्मचारी, व्यावसायिक तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत ६० मिनिटांचे अकमास्टरक्लास आयोजित करण्यात येत असून, इच्छुकांनी www.mscit.ai या संकेतस्थळावर नोंदणी करून लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. MS-CIT च्या नव्या एआय सक्षम अभ्यासक्रमात १२५ हून अधिक अकटूल्स आणि २५० पेक्षा अधिक डिजिटल साधनांचा समावेश करण्यात आला आहे. यात ChatGPT, Microsoft Copilot, Google Gemini, Canva AI यांसारख्या आधुनिक अकसाधनांचा समावेश असून, याशिवाय डेटा सायन्स, वेब डिझाईन, Python, सायबर सिक्युरिटी, क्लाऊड कॉम्प्युटिंग, Tally with GST आदी रोजगाराभिमुख KLiC अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत.

याबाबत माहिती देताना MKCL गोंदिया जिल्हा समन्वयक उमेश वेद्य यांनी सांगितले की, "कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) हे भविष्याचे कौशल्य नसून आजच्या काळातील अत्यावश्यक कौशल्य आहे. गोंदिया जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिकांनी या मोफत एआय मास्टरक्लासचा लाभ घेऊन एआय चा जबाबदारीने आणि प्रभावीपणे वापर शिकावा. MS-CIT ला मिळालेल्या SKOCH पुरस्कारामुळे राष्ट्रीय स्तरावर गौरव मिळाला असून, जिल्ह्यातील सर्व MKCL अधिकृत शिक्षण केंद्रांमार्फत हे अभियान नागरिकांपर्यंत पोहोचविले जात आहे." या अभियानात सर्व शाळा, महाविद्यालये, उद्योग, शैक्षणिक संस्था, पालक आणि विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. आगामी काळात जिल्ह्यात विविध ठिकाणी एआय जनजागृती कार्यक्रम, मार्गदर्शन सत्रे आणि नोंदणी मोहिमा आयोजित करण्यात येणार असल्याची माहितीही MKCL प्रशासनाने दिली आहे.

## बारमध्ये दोन गटांत कोयत्याने हल्ला, एकाचा मृत्यू तर दोघे गंभीर जखमी

**वृत्तसंस्था, लातूर**

लातूर शहरातील विवेकानंद पोलीस ठाण्याच्या हद्दीत मध्यरात्री एका बारमध्ये दोन गटांमध्ये झालेल्या वादाचे हिंसक रुपांतर झाले आहे. दोन्ही गटांनी एकमेकांवर कोयत्यासह हल्ला केल्याने एक तरुणाचा मृत्यू झाला असून दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. या संपूर्ण घटनेचा सीसीटीव्ही फुटेज समोर आला असून, त्यामध्ये हातात कोयते घेऊन एकमेकांवर हल्ला करताना संबंधित दिसत आहेत. या घटनेमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मात्र उपचार सुरु असताना गंभीर जखमी असलेल्या सोपान बोमाईने या तरुणाचा मृत्यू झाला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन लातूर पोलिसांनी तीन पथके तयार करून आरोपींचा शोध सुरू केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास विवेकानंद पोलीस करत आहेत.

# मुख्यमंत्री फडणवीस इनका जन्मदिन "सेवा गौरव दिन"

### महाराष्ट्र राज्य सफाई कामगार आयोग के अध्यक्ष शेरसिंग (सतीश) डागोर इन्होने पत्रपरिषद मे दी जानकारी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर**

महाराष्ट्र के लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस के जन्मदिवस के उपलक्ष्य में २२ जुलाई को "सेवा गौरव दिन" का आयोजन नागपुर में किया जाएगा। यह आयोजन संपूर्ण सुदर्शन, वाल्मीकि एवं मखियार समाज तथा विभिन्न सामाजिक संगठनों के संयुक्त तत्वावधान में आयोजित किया जा रहा है।

महाराष्ट्र राज्य सफाई कामगार आयोग के अध्यक्ष शेरसिंग (सतीश) डागोर के विशेष प्रयत्न से इस कार्यक्रम का आयोजन किया जा रहा है। कार्यक्रम का आयोजन प्रातः १० बजे से सायं ५ बजे तक कुंदनलाल गुप्ता वाचनालय, इमामवाड़ा आयसोलेशन हॉस्पिटल परिसर के सामने नागपुर में होगा।

आयोजकों के अनुसार देवेंद्र फडणवीस ने अपने सार्वजनिक जीवन में समाज के सामाजिक शैक्षणिक रोजगार एवं सफाई कामगारों से जुड़े अनेक महत्वपूर्ण मुद्दों के समाधान के लिए उल्लेखनीय योगदान दिया है। नागपुर महानगरपालिका में महापौर रहते हुए रोजगार के अवसर उपलब्ध कराने सफाई कर्मचारियों के हितों की रक्षा अनुसूचित जाति के शिक्षित एवं अशिक्षित बेरोजगारों के लिए विभिन्न योजनाओं को प्रोत्साहन महिलाओं के आर्थिक सशक्तिकरण तथा विद्यार्थियों के लिए कल्याणकारी योजनाओं के माध्यम से समाज के विकास में उनकी महत्वपूर्ण भूमिका रही है। इन्हीं योगदानों के प्रति सम्मान एवं कृतज्ञता व्यक्त करने के उद्देश्य से "सेवा गौरव दिन" का आयोजन किया जा रहा है।

कार्यक्रम का उद्घाटन महाराष्ट्र राज्य के महसूल मंत्री एवं नागपुर जिले के पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे के करकमलों द्वारा होगा। कार्यक्रम में महापौर नीताताई ठाकरे उपमहापौर, लीलाताई अजय हाथीबेड, राज्यसभा सदस्या मायाताई इवनाते, पूर्व राज्यसभा सदस्य अजयजी संचेती, आमदार कृष्णाजी खोपडे, मोहनजी मते, प्रवीणजी दटके, विधान परिषद सदस्य संजयजी भेंडे, एवं परिणयजी फुके, भाजपा शहर अध्यक्ष दयाशंकरजी तिवारी, स्थायी समिती अध्यक्ष शिवानीताई दाणी, पूर्व विधायक सत्तापक्ष नेता नरेंद्रजी बोरकर, भाजपा शहर महामंत्री रितेशजी गांवडे उसी प्रकार विशेष मेहमान उपस्थित रहेंगे। सहित अनेक जनप्रतिनिधि एवं गणमान्य अतिथि उपस्थित रहेंगे। इस कार्यक्रम में ५०० महिलाओं को सिलाई मशीन, ५९९ विद्यार्थीओ को सायकल, उसीप्राकर २०० युवाओंको ई- रिक्षा का वितरण किया जायेगा। इस अवसर पर समाज के विभिन्न क्षेत्रों में कार्यरत व्यक्तियों सामाजिक कार्यकर्ताओ एवं नागरिकों की भी बड़ी संख्या में उपस्थिति अपेक्षित है। आयोजन में समाज के विकास, शिक्षा, रोजगार, एवं सामाजिक सशक्तिकरण से जुड़े विषयों पर भी विचार-विमर्श किया जाएगा।

इस कार्यक्रम के सफल आयोजन हेतु विविध सहयोगी सामाजिक संघटनाओंका सहकार्य प्राप्त हुआ है। कार्यक्रम के आयोजक शेरसिंग उर्फ सतीश डागोर अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग मुंबई ने समाज के सभी बंधुओं मातृशक्ति एवं नागरिकों से परिवार सहित अधिक से अधिक संख्या में उपस्थित होकर कार्यक्रम को सफल बनाने तथा देवेंद्रजी फडणवीस के समाजहित में किए गए कार्यों के प्रति अपनी कृतज्ञता व्यक्त करने का आग्रह किया है।

# 'आई-वडिलांनी घेतले बाल संरक्षणाचे धडे'

### जिल्हा बाल संरक्षण कक्षाचा उपक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्य श्रीमती गीतांजली बुटी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रॉव्हिडन्स गर्ल्स हायस्कूल येथे पालकांसाठी बाल संरक्षण जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे मार्गदर्शन जिल्हा बाल सुरक्षा अधिकारी मुस्ताक पठाण यांनी केले. त्यांनी पालकांना बालकांचे हक्क, बाल संरक्षण, सुरक्षित व असुरक्षित स्पर्श, ऑनलाइन सुरक्षितता, बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध, पालकांची जबाबदारी तसेच बालकांशी संवादाचे महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. मुलांच्या सुरक्षित आणि सर्वांगीण विकासासाठी पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्य श्रीमती गीतांजली बुटी यांनी बालकांच्या संरक्षणासाठी पालक, शाळा आणि समाज यांनी एकत्रितपणे कार्य करण्याची गरज व्यक्त केली. प्रत्येक बालकाला सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि संरक्षणात्मक वातावरण मिळणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास शेकडो पालक, शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवर्ग तसेच शाळेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित पालकांनी बाल संरक्षणासंदभार्तील विविध प्रश्न विचारून मार्गदर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# वरोरा पोलिसांनी १३ मोटरसायकल जप्त करून तीन आरोपींना केली अटक



**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा**
**धर्मेंद्र शेरकुरे**

वरोरा पोलिसांनी दुचाकी चोरींच्या प्रकरणांमध्ये तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे सविस्तर वृत्त असे की गेल्या काही दिवसापासून वरोरा शहरातील व आसपासच्या खेडेगावातील मोटरसायकली चोरीच्या घटना घडल्या होत्या. वरोरा येथील वैष्णव नगर वार्डातील रहिवासी नामे अमोल दयाराम भोंग वय ३२ वर्ष यांच्या तोंडी रिपोर्ट वरुन त्यांची दुचाकी क्रमांक MH 34-BK 5527 किंमत ४० हजार रुपये या दुचाकी वाहनाची चोरीची तक्रार वरोरा पोलीस स्टेशन येथे तक्रार अपराध क्रमांक ७८९/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.स कायदा २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता तसेच यापूवीर्सुद्धा वरोरा शहरातून वारंवार मोटार सायकल चोरीच्या घटना झालेल्या होत्या.

सदरचा गुन्हा दाखल होताच वरोरा पोलीस स्टेशन ठाणेदार ओम प्रकाश सोनटक्के यांनी तात्काळ पोलीस स्टेशन वरोरा येथील तपास पथक सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद भस्मे सोबत पोलीस स्टॉप यांना सदर मोटरसायकल चोरी करणाऱ्या इसमाचा कसून शोध घेणे बाबत सांगितले.

पोलीस स्टेशन वरोरा येथील तपास पथक यांनी वरोरा शहरातील ५० कॅमेराचे सीसीटीव्ही फुटेज तसेच नागपूर चंद्रपूर हायवे रोडवरील ७० कॅमेरेचे सीसीटीव्ही फुटेज चेक करून मोटरसायकल चोरी करणारा इसम हा आरोपी १ हेमंत विनोद चौधरी वय ३५ वर्ष राहणार सिंगोव गोटमाडी तालुका समुद्रपूर जिल्हा वर्धा २ सुरज एकनाथ उंबरे वय २८ वर्ष रा. दहेगाव तालुका वरोरा जिल्हा चंद्रपूर यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी वरोरा शहर येथून चोरी केलेल्या एकूण ११ मोटर सायकल बाबत माहिती दिली. सदर मोटरसायकल आरोपीतांनी जिल्हा वर्धा येथे विक्रीकरिता दिलेल्या होत्या तसेच आरोपी प्रमोद रामकृष्ण हेपट वय ३५ वर्ष राहणार वरोरा यांनी बनावट आरसी तयार करून आरोपीतांना दिलेल्या होत्या सदर आरोपीकडून बनावट आरसी व दोन मोटरसायकल असा एक लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

जप्ती मुद्देमाल एकूण मोटरसायकल १३ त्याची किंमत सहा लाख ४० हजार रुपये एवढी आहे सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष बाकल, प्रभारी अधिकारी ओमप्रकाश सोनटक्के, यांचे मार्गदर्शनात स पो निरीक्षक शरद भस्मे, पोलीस स्टॉप हवालदार सुखराम यादव, पोलीस हवालदार संदीप मुळे, पोलीस हवालदार प्रशांत नागोसे, पोलीस हवालदार अमोल नवघरे,पोलीस हवालदार नितीन रायपुरे,पो अ मनोज ठाकरे व पो अ विशाल राजूरकर,पो अ महेश गावतुरे, यांच्या मदतीने पो. स्टे वरोरा यांनी सदरची कारवाई केली.

# बाबुराव तिडके यांनी इतरांच्या जीवनात आनंद पेरला!

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन, बाबुरावजी तिडके श्रद्धांजली सभा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

उमद्या व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेल्या बाबुराव तिडके यांनी नेहमीच जनसामान्यांचा विचार केला. इतरांच्या जीवनात आनंद पेरण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. त्यामुळेच त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांची संख्या मोठी आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबुराव तिडके यांना आदरांजली वाहिली. ज्येष्ठ काँग्रेस नेते बाबुराव तिडके यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी चिटणवीस सेंटर येथे सर्वपक्षीय सभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, माजी केंद्रीय मंत्री



विलास मुत्तेमवार, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

आपल्या वडिलांशी तिडके यांची घनिष्ठ मैत्री होती असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पक्षाच्या पलिकडे मैत्री जपण्याचा त्यांचा स्वभाव होता. सहकाराच्या क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय काम केले. आपला साखर कारखाना अडचणीत आला त्यावेळी तो वाचावा, कर्मचाऱ्यांचे पगार वेळेत देता यावे यासाठी गृहलक्ष्मीचे दागिने त्यांनी तारण ठेवले, इतकी कळकळ त्यांच्यात होती, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, तिडके हजरजबाबी होते. भूविकास बँकेचे अध्यक्ष म्हणून काम करताना शेतकऱ्यांच्या अडचणी त्यांनी सोडविल्या. संबंधांमध्ये त्यांनी कधी पक्ष येऊ दिला नाही.

सहकार, शिक्षण, सामाजिक अशा क्षेत्रातील ते मार्गदर्शक होते, असे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी बोलताना म्हणाले. समाजाप्रती कळकळ असलेल्या या नेत्याचा जीवन प्रवास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असे पालकमंत्री बावनकुळे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन बाळ कुलकर्णी यांनी केले.

# राजेंद्र पवार यांचे शेती आणि शेतकरी समर्पित कार्य प्रेरणादायी

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन, राजेंद्र पवार यांना डॉ. सी.डी. मायी कृषीतज्ज्ञ पुरस्कार प्रदान

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शेतकऱ्यांपर्यंत अत्याधुनिक शेती तंत्र पोहोचविण्याचे, विविध नवनवीन आणि यशस्वी प्रयोगांशी शेतकऱ्यांना अवगत करणे या कार्यामधून राजेंद्र पवार यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आपली कटिबद्धता सिद्ध केली आहे, या शब्दांत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी राजेंद्र पवार यांचा गौरव केला.



कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा डॉ. सी.डी. मायी कृषीतज्ज्ञ पुरस्कार बारामती येथील ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार यांना नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, ज्येष्ठ कृषीतज्ज्ञ डॉ. सी.डी. मायी, ज्येष्ठ कृषी पत्रकार सुधीर भोंगळे, कृषी विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष गिरीश गांधी, श्रीराम काळे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

गडकरी म्हणाले, राजेंद्र पवार यांचे कृषी क्षेत्रातील कार्य आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळे डॉ. सी.डी. मायी यांच्या नावाने असलेला पुरस्कार त्यांना मिळत असल्याचा मनापासून आनंद आहे. डॉ मायी शेतकरी आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सातत्याने कार्य करीत आहेत. सरकारी नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यानंतरही त्यांचे कार्य सुरू आहे, ही आदर्श बाब आहे. त्यांच्याच प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात नर्सरी कायदा आला.

शेतीमध्ये जमीन हा महत्त्वाचा घटक आहे. दजेर्दार उत्पादनासाठी माती परीक्षण आवश्यक आहे. पाण्याच्या संदर्भात काम करण्याची गरज आहे. ठिबक सिंचन, ड्रोनद्वारे फवारणी हेही घटक शेतीमध्ये महत्त्वपूर्ण ठरत आहेत. या सर्व तंत्रांचा वापर शेतीमध्ये केला तरच एकरी उत्पन्न वाढेल आणि शेतकरी समृद्ध होईल. राजेंद्र पवार आणि त्यांचे ट्रस्ट यासंदर्भात सातत्याने शेतकऱ्यांचे मार्गदर्शन करीत आहे, ही समाधानाची बाब आहे, असेही गडकरी म्हणाले.